


प्रफुल शेजव

# मला काही सांगाचंय

## भाग४

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# प्रफुल राजेंद्रराव शेजव

लिखित

सुपरहिट कादंबरी

# मला काही सांगाचंय...

## चा भाग 4

# मला काही सांगाचंय... भाग ४

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

मला काही सांगाचंय... भाग ४ (कादंबरी)

लेखक : प्रफुल राजेंद्रराव शेजव

शिक्षण : MBA

ई मेल : praful101shejao@gmail.com

मोबाईल नंबर : 8805967973

पत्ता : मु. पाळा ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २ ऑक्टोबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे .

# मला काही सांगाचंय... ( भाग चार )

प्रिय रसिक वाचकांनो,



आपणा सर्वांचे खूप खूप आभार..."मला काही सांगाचंय..."या कादंबरीच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या भागास इतकं भरभरून प्रेम दिल्याबद्दल धन्यवाद! कादंबरी लिहितांना असा काही प्रतिसाद मिळेल याची काहीएक जाणीव मला नव्हती... यामुळेच कादंबरीचा पहिला भाग २०१६ मध्ये लिहून मी जवळजवळ लिखाण बंद केले होते. पण कदाचित नियतीला माझ्याकडून अजून काही तरी अपेक्षित होतं म्हणूनच स्पर्धा परीक्षा क्लासच्या निमित्ताने"विशाल इंगळे"यांच्याशी काही दिवसांपूर्वी माझी भेट झाली... ते स्वतः एक लेखक आहेत. (http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/ha_kshan_vishal_ingle. pdf) त्यांच्याकडून मला ई साहित्य प्रतिष्ठानबद्दल माहिती मिळाली आणि सहज म्हणून मी पहिल्या भागाची सॉफ्टकॉपी ई साहित्य टीमला ईमेल केली आणि ई साहित्य टीमने कादंबरीची संकल्पना आवडली असल्याचे कळविले... पहिला भाग १० डिसेंबर २०१८ रोजी प्रकाशित करण्यात आला."मला काही सांगाचंय..."या कादंबरीचा ई बुकच्या रूपाने एका रसिकाडून दुसऱ्या रसिकाकडे प्रवास सुरू झाला... भाग १ ला आपण रसिकांनी दिलेली पसंती आणि प्रतिसादाने मला प्रोत्साहित केले... पुढचा भाग कधी प्रकाशित होईल अशी रसिकांकडून विचारणा केली जात होती... रसिकांचे कित्येक ईमेल आणि फोन कॉल्स मला स्वस्थ बसू देत नव्हते म्हणून रोज ठराविक वेळ लिखाणाकरिता राखीव ठेवून भाग २ लिहून पूर्ण केला आणि २६ फेब्रुवारी २०१९ रोजी दुसऱ्या भागाचे प्रकाशन करण्यात आले, आपण चाहत्यांची आवड जपून ठेवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आणि आणखी पुढे काय? या अपेक्षित प्रश्नाची मी वाट पाहून होतो... निश्चितच माझी अपेक्षा पूर्णत्वास आली, आपण

रसिकांची उत्कंठा वाढतच गेली... तर तिसऱ्या भागाकरिता आपणास वाट पाहावी लागली याकरिता मला नक्की माफ कराल हि अपेक्षा करतो... रसिकहो आपणा चाहत्यांची प्रतीक्षा संपली...

कित्येक वाचक कथेतील पात्र जणू सोबत असल्याचं भासतं, कादंबरी वाचतांना आपण हि कुमारच्या जीवनाचा एक भाग आहोत की काय असं वाटत असल्याचं सांगतात... तर काही रसिक सात, आठ दिवस झाले की फोन करून विचारत असतात , नंतरचे लिखाण पूर्ण झाले की नाही? आणखी कितीवेळ लागेल...? पुढील भाग लिहून झाला आणि ई साहित्य प्रतिष्ठान च्या वेबसाईट वर प्रकाशित झाला की जरूर कळवा... असेही अगदी अनपेक्षित प्रतिसाद मिळाले, खरंच आपण रसिकांनी मला खूप प्रोत्साहित केले म्हणूनच पुढील दोन भाग एकसाथ लिहून पूर्ण केले आणि एकाचवेळी सोबतच प्रकाशित करायचं ठरवलं..."मला काही सांगाचंय... ( भाग ३ )"आपणांस नक्कीच आवडला असेल, मनात पुढे काय? हा अपेक्षित प्रश्न निर्माण झाला असेल... कुमारची डायरी वाचण्याची आतुरता लागली असेल... तर आपल्या समोर प्रस्तुत आहे....

"मला काही सांगाचंय... ( भाग ४ )"

मला एक नवीन ओळख, जीवन आणि रसिक देणाऱ्या, मार्गदर्शन करणाऱ्या माननीय सुनिल सामंत सर आणि ई साहित्य टीम चे खूप खूप आभार... धन्यवाद!

## रसिक वाचकांकरिता एक विनंती :-


प्रिय रसिक वाचक,


कादंबरीचा पहिला भाग प्रकाशित होऊन जवळपास ६ महिने झाले आणि दुसरा भाग प्रकाशित होऊन ४ महिन्यांचा कालावधी लोटून गेला तर तिसरा भागही झाला एक महिनाभर. वाचकांच्या प्रचंड मागणीला अनुसरून हा चौथा भाग. वाचकांना एक नम्र विनंती करतो की भाग ३ वाचायला सुरूवात करण्यापूर्वी एकदा भाग १,२ आणि ३ वरून ओझरती नजर टाकल्यास या भागाचे वाचन आणखी मनमोहक तसेच मजेशीर वाटेल... नक्कीच वाचनाचा जास्त आनंद उपभोगता येईल... दोन्ही भागांच्या लिंक खाली दिलेल्या आहेत...


http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/mks1_praful_shejao. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/mks_2_praful_shejav. pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mks_3_prafull_shejav.pdf



अनुक्रमणिका :-


३३. आशा, निराशा

३४. लपंडाव

३५. भाग्य

३६. का?

३७. स्वार्थ

३८. बहर - निसटून गेलेले क्षण

३९. सोबती - जुने कि नवे

४०. एक घाव आणखी

## ३३. आशा, निराशा

कितीतरी वेळ ती तशीच खुर्चीत बसून होती... मनात येणारे प्रश्न तिला आणखी जास्त त्रास देत होते... डोकं शरीरापेक्षा जड झालं की काय असं तिला वाटून गेलं, तिच्या मनात सतत एकापाठोपाठ एक विचार येत होते... असं स्वप्न का पडलं? त्याचा नेमका काय अर्थ असावा? कुमार ठीक तर असेल ना? मला असं स्वप्न पडले नियतीचा काही संकेत तर नसावा...?

अनेक प्रश्न तिच्या मनात घर करत होते, ती बेचैन झाली, शेवटी विचारांचं ते वादळ दूर करत ती बेडरुममध्ये गेली... आत प्रवेश केला, तिची नजर डायरीवर स्थिरावली... पण यावेळी कुमारने पुढे काय लिहिलं आहे ते वाचण्याचा मोह आवरत, तिने मोबाईल हाती घेतला आणि कॉल लावला... तर फोन व्यस्त असल्याचं तिला समजलं तरीही तिने फोन सुरूच ठेवला आणि रिंग जात असल्याचा आवाज तिने ऐकला, काही सेकंदातच तिला पलीकडून प्रतिसाद मिळाला..."हॅलो..."

लगेच तिने बोलायला सुरुवात केली..."हॅलो सुजित... तु कुमार जवळ आहेस ना, तो कसा आहे? ठीक आहे ना?"

"हो... आता तो ठीक आहे, डॉक्टरांनी थोड्यावेळा पूर्वी त्याला तपासलं, तो लवकर पूर्णपणे बरा होईल म्हणाले..."

"ऐकून बरं वाटलं..."

“तु येणार आहे की नाही?”

“होय.. मी येत आहे, पण तू असं का विचारलं?”

“तू इतक्या तातडीने त्याची विचारपूस केली, तर मला वाटलं तुला काही काम आलं असेल आणि बहुतेक तुला इकडे यायला जमणार नाही…”

“काही काम नाही, मी लवकरच निघते… मी फोन ठेवते.."

“एक मिनिट थांब…”हिला डायरी सोबत घेऊन ये, असं एकदा आठवण करून द्यायची म्हणून सांगू का? तो मनातच स्वतःला विचारू लागला…

“हॅलो… हॅलो…. सुजित काय म्हणतोस?”

“बस स्थानकला आल्यावर मला कॉल करशील म्हणजे मी तुला घ्यायला येईल…”तो मनातलं मनातच ठेवून तिला म्हणाला.. परत परत डायरीबद्दल विचारल्याने तिला काही संशय येऊ शकतो… त्याने स्वतःला समजावलं…

“मी ऑटोने येईल , तुला उगाच त्रास होईल…"

“काही त्रास होत नाही, उलट तुलाच उन्हात ऑटो शोधायला त्रास होईल…”

“बरं, ठीक आहे, मी तिथे आल्यानंतर तुला कॉल करते, ठेवते...”

सुजितसोबत फोनवर बोलून तिला बरं वाटलं... मनात विचारांचं सुरु असलेलं द्वंद्व थांबलं, डोक्यावरचा ताण कमी झाला तसं तिला ते सकाळचं स्वप्न जसे पक्षी उंच भरारी घेऊन नाहीसे होतात तसे झाले... तिने राहिलेली काम पटापट उरकून तयारी केली आणि ती बस स्थानकाच्या दिशेने निघाली... आजचा दिवस काल सारखाच, रोज उजाळतो तसाच उजाळला... तेच रस्ते, तीच परिचित - अपरिचित लोकांची सोबतच वाहनांची गर्दी, भाजी मंडई, नियमित उघडणारी दुकान, रस्त्यावर कच्च्या पिकल्या आंब्याच्या हातगाड्या, सुगंधित ताज्या फुलांच्या माळा लटकवलेली हारांची दुकान, अन तिच्या आवडीचं गुलमोहोराचं झाडं... हे सर्व काल जसं होत तसंच काहीसं आजही... पण काल तिला हे सर्व काही काळासाठी नजरेआड झालं की काय असं वाटलं होतं तर आज तिला हे आजूबाजूचं वातावरण हवंहवंसं आणि प्रसन्नतेची अनुभूती देणार वाटलं... काहीवेळ तिला वाटलं की हे कधी बदलायला नको... तिच्या या विचारांचं तिला जरा हसू आलं, कोणताच बदल नाही ती सृष्टी कसली? नाविन्य नाही ते आयुष्य कसले? अश्या मंद विचारांच्या सोबतीने, ती जास्त लगबग न करता, अति हळू न चालता, मध्यम चालीने बस स्थानकात पोहोचली...

बस वर लावलेली पाटी पाहून ती आत चढली, सुदैवाने तिला खिडकीजवळ रिकामी सीट मिळाली... ती पटकन सीटवर बसली, काही वेळातच बस पूर्ण भरली, बसमध्ये खूप गर्दी झाली असं तिला जाणवलं खरं तर काल इतकीच गर्दी आज होती पण आज ती स्थिर मनाने सर्व गोष्टी न्याहाळत होती... इतक्यात बस सुरु झाली आणि तिचा कालचा प्रवास सुद्धा! आज परत नव्याने.........

उन्हाळ्याचे दिवस, एप्रिल महिना म्हणजे लग्न समारंभ! काही विद्यार्थ्यांना सुट्टी लागलेली असते, नातेवाईकांच्या भेटीगाठी करिता राखीव वेळ म्हणावा लागेल, सर्व प्रकारच्या वाहतुकीची गर्दी..! मनात असे काही विचार करत तिने इकडे तिकडे नजर फिरवली... बसमधली ती गर्दीने दाटलेली माणसं तिला जास्त वेळ बघवली नाही, ती एक हात खिडकीत ठेवून बाहेर पाहू लागली... घामाने ओल्या झालेल्या चेहऱ्याला  हवाहवासा वाटणाऱ्या गार वाऱ्याच्या सुखानुभवाने तिने किंचित डोळे मिटले... तिचे मन प्रसन्न झाले...

तिच्या मनात पहाटेच ते स्वप्न जरावेळ घोळलं, तिला चार वर्ष्यापूर्वी शेवटी जेव्हा कुमारला बघितलं तो क्षण आठवला, काहीवेळ ते चित्र तिच्या डोळयासमोर तरळत राहिलं... मग काल त्याला ज्या अवस्थेत तिने पाहिलं ते हि तिच्या नजरेसमोर साकार झालं आणि पुढच्या क्षणी डायरीत वाचलेलं कुमारचं लिखाण ती आठवायला लागली... तिचा आठवणींच्या दिशेने परतीचा प्रवास सुरु झाला... कुमार आणि त्याची डायरी या वेगळयाच दुनियेत ती हरवली, त्या आठवणीत विलीन झालेल्या क्षणांशी एकरूप होऊन झोपी गेली...

बस शहरातील स्थानकात पोहोचली, प्रवाश्याच्या खाली उतरण्याच्या गडबडीने तिला एक दोन जणांचा धक्का लागला अन तिला जाग आली... गर्दीतून वाट काढीत ती बसमधून खाली उतरली. बस स्थानकात जणू काही यात्रा भरली असं तिला भासलं... ती पायी चालत बस स्थानकातून बाहेर निघाली, उन्ह चांगलंच तापलेलं... खांद्यावरची हॅन्डबॅग जरा डोक्यावर धरून तिने झपझप पावलं उचलली, मुख्य रस्त्यावर आली तिथं बाजूलाच कडुनिंबाची विशाल सावली देणारी झाडं लावली होती... ती एका झाडाच्या सावलीत उभी राहिली... तिने सुजितला फोन करून बस स्थानक ला आल्याचं सांगितलं, त्यावर सुजितने लगेच येतो असं बोलून फोन ठेवला... जरावेळ विचार करून तिने आजूबाजूला नजर फिरवली, तिला टरबूज नजरेस आले आणि तिने

विकत घेतले... तर सुट्टे पैसे नसल्याने तिने आणखी द्राक्ष सुध्दा खरेदी केले... झाडाच्या सावलीत परत येऊन ती सुजित येण्याची वाट पाहत थांबली...

काही वेळातच सुजित बस स्थानकजवळ आला... त्याने इकडे तिकडे नजर फिरवली, त्याला झाडाखाली ती उभी दिसली... तिला घेऊन तो दवाखान्याकडे जायला निघाला, वाटेत तिने कुमार कसा आहे? डॉक्टर काय म्हणताहेत? काही काळजीचं कारण तर नाही ना? मनात होते नव्हते सर्व विचारून घेतले... सुजितने तिला सर्व ठीक आहे, असं सांगितलं... फक्त कुमार अजून कुणाशीच बोलला नाही तर बहुतेक बोलतांना त्याला त्रास होत असावा असं डॉक्टरांचं म्हणणं असल्याचं हि त्याने तिला सांगितलं...

तिच्या मनात विचार आला, कित्येक दिवसानंतर कुमारने फोन केला होता, अचानक अपघात घडला, त्यादिवशी भेटायला आले होते तर कुमार बेशुध्द होता आणि आज तरी त्याच्यासोबत दोन शब्द बोलायला मिळेल या आशेने त्याला बघायला आले पण पदरी निराशा येणार याची कल्पना नव्हती... मध्येच आलेल्या खड्ड्याने दुचाकी ला झटका बसला आणि तिच्या मनात फिरणार विचारचक्र थांबलं.

सुजित,”तू आज सकाळी त्याला भेटला का?”तिने विचारलं.

“नाही, त्याला विश्रांती घेऊ द्या, असं डॉक्टर  म्हणाले त्यामुळे त्याला भेटणं जमलं नाही.."

“बाकी आणखी कोण कोण भेटायला आले आहे?”

“त्याचे तीन मित्र आले आहेत म्हणजे रस्त्याने असतील.."

“हो काय.. छान!”

या उत्तराबरोबर त्याला ऋतुराजची दुचाकी पंक्चर झाल्याची आठवण झाली, त्यांनी दुचाकी दुरुस्त तर केली असेल ना? मी सांगितलेला पत्ता त्यांना मिळाला कि नाही? तो मी परत फोन करणार म्हणून माझ्या फोनची वाट पाहत असेल असे विचार एकाचवेळी त्याच्या डोक्यात नाचायला लागले... थोड्या वेळातच बोलता बोलता ते दवाखान्यात पोहोचले. ते कुमारच्या रुमजवळ आले, त्याचे आई वडील आशा निराशा अश्या मिश्र भाव असलेल्या चेहऱ्याने जणू कुमार लवकर बरा व्हावा फक्त इतकीच प्रार्थना करत होते... तिने जवळ जाऊन त्या माऊलीच्या खांद्यावर हात ठेवला. तिने नजर वर करून तिला पाहिले, दुसऱ्या क्षणी आसवांनी पापण्यांचा बांध मोडला. सरी झरझर वाहू लागल्या...

हातातील टरबूज, द्राक्ष सुजितला देत ती बाजूला बसली.. धीर देऊ लागली,”काकू, स्वतःला सांभाळा, काळजी करू नका, कुमार लवकरच ठीक होईल”

ती माऊली तिच्या गळयात गळा घालून रडायला लागली,”काकू असं हिम्मत सोडून कसं चालेल?”

असं बोलतांना खरं तर तिचा कंठ दाटून आला पण तिने तसं जाणवू दिल नाही...”सुजित, हे फळ कुमार खायला दिलं तर चालेल का? जरा डॉक्टर किंवा नर्स ला विचारून घे, मला काही कल्पना नव्हती म्हणून मी हे घेऊन आले..”

“हो”फक्त इतकंच बोलून तो निघून गेला... त्या दोघींना जरावेळ मोकळीक मिळाली तर बरं होईल असं त्याला वाटलं. डॉक्टरला त्याने ती फळ कुमारला दिली तर चालतील का ते विचारलं आणि नर्सजवळ ती पिशवी दिली, तो बाहेर हॉलमध्ये आला... त्याने अनिरुध्दला फोन लावला, पलीकडून त्याला प्रतिसाद मिळाला”हॅलो सुजित”

“हॅलो अनिरुध्द, कुठे आहे? दुचाकीचा पंक्चर दुरुस्त केला की नाही?”

“सुजित, इकडे जरा जास्त भानगड वाट्याला आली...”

“काय झालं? ऋतुराजला फोन दे बरं”

“हॅलो सुजित, अरे दुचाकी पंक्चर झाली होती, दुकानाला आलो तर ट्यूब बदलावी लागली म्हणून परत इकडे तिकडे शोधाशोध करून ट्यूब मिळवली... अजून अर्धा तास तरी लागेल.”

“अरे यार, हि तर भलतीच भानगड झाली.”

“कुमार आता कसा आहे?”तिघांनी एकसाथ विचारलं...

“ठीक आहे, मी अजून भेटलो नाही, बरं ती आली...”

“काय? ती आली, तिच्याकडून आठवणीने डायरी घे आणि आम्ही येईपर्यंत शक्यतोवर तिला थांबव.”तिघांनी एक एक शब्द मध्ये बोलून मिळूनच हे वाक्य पूर्ण केलं...

“ठीक आहे, ठेवतो”म्हणत त्याने फोन ठेवला... तो हॉलमधून कुमारच्या रूमकडे जायला निघाला... मला तर डायरीचा जसा विसरच पडला होता, बरं झालं ऋतुराजला फोन केला, त्यामुळं डायरी परत घ्यायचं कळलं... आणखी विसर पडायच्या आधी तिला डायरी मागणं योग्य राहील असे मनातच विचार करत तो त्यांच्याजवळ पोहोचला....

## ३४. लपंडाव

कुमारचे आई वडील तिच्याशी काही जुन्या आठवणी तेव्हा ताज्या झाल्याने पुन्हा एकदा नव्याने आठवून बोलत होते, ती सारं मन लावून फक्त ऐकत होती... मध्येच त्यांना दिलासा देत होती, तिला पूर्ण कल्पना होती की  कुमार म्हणजे त्यांचा एकमेव आधार.. नियतीनं का असा खेळ मांडला असं तिला क्षणभर वाटून गेलं, काही वेळानंतर जुन्या आठवणीत भिजवून तो भावनारूपी पाऊस शांत झाला... सोबतच त्यांचं बोलणं थांबलं आणि तिच्या मनात पावसानंतर तळं साचावं तसे विचार एकामागून एक साचायला लागले... मध्येच त्याच्या डायरीत वाचलेले काही प्रसंग त्या साचलेल्या पाण्यात होडी बनून इकडे तिकडे बेभान होऊन जलविहार करू लागले... इतक्यात तिला कुणीतरी तिच्या बाजूला येऊन उभा असल्याची जाणीव झाली, तिने मान जरा वर उचलून बाजूला पाहिले... तर तिला सुजित दिसला पण त्याच्या चेहऱ्यावरचे भाव काहीसे बदलले असं तिला जाणवलं... त्याला काहीतरी बोलायचं किंवा विचारायचं आहे असं त्याचे हावभाव सांगत होते पण तो स्वतःहून काही बोलला नाही तेव्हा तिनेच विचारलं..."सुजित, काय झालं? तु जरा गोंधळलेला दिसतोस... सर्व ठीक आहे ना?"

तिने स्वतःच विचारलं हे फार छान झालं पण इथे तिला डायरीबद्दल विचारणं योग्य नाही हे लक्षात घेऊन त्याने ऋतुराज, अनिरुध्द आणि आर्यन इकडे येत असताना ते दुचाकी पंक्चर झाल्याने जरा अडचणीत आले त्यामुळे मी थोडा वेळ त्रस्त झालो बाकी काही नाही असे सांगत त्याने डायरीचं बोलायचं कसतरी टाळलं... इतकं बोलत असतांना तिने तिची हँडबॅग कुठे ठेवली म्हणून तिच्या आजूबाजूला त्याने नजर फिरवली तर तिने हँडबॅग खांद्यांची काढून आता मांडीवर ठेवली होती...

त्याने सांगितलेलं स्पष्टीकरण तिला तितकंसं पटलं नाही पण इथे जास्त बोलणं बरोबर नाही हे ध्यानात घेऊन तिने मिळालेलं उत्तर समाधानकारक नाही असं मनातलं मनातच हेरलं आणि नंतर सुजित ला विचारावं असं ठरवून तिने प्रतिसाद दिला"अस्स होय तर.."आणि पुन्हा तिथं शांतता पसरली. काही वेळानंतर डॉक्टर नर्स सोबत कुमारच्या रूममध्ये गेले, त्याला तपासून परत आले... सर्वजण कुमार आता कसा आहे? काही बोलला का? हे जाणून घेण्यासाठी डॉक्टर पुढे जमले..

सर्वांचे चेहरे पाहून डॉक्टर देवांश यांना कुमारचे आई वडील आणि इतर आप्तेष्ट यांच्या मनातील भावना, प्रश्न सवयीने न सांगता समजले आणि कुणी काहीएक विचारण्याआधी ते म्हणाले,"कुमारच्या तब्येतीत आता खूप सुधार झाला आहे आणि लवकरच तो पूर्णपणे बरा होईल, काळजीचं मुळीच कारण नाही..."

सगळयांच्या मनावरचं चिंतेच सावट दूर झालं, दडपण कमी झाल्याने चेहऱ्यावर काहीसं तेज आलं होतं, आतापर्यंत मनात अंकुरलेली आशेची पालवी भक्कम आधार घेऊन डोळयात विश्वासाची चमक आली अन ती चमक एकमेकांच्या नजरेत नजर मिळवून पाहिल्याने आणखी प्रखर झाली... प्रत्येकाला ते बोलणं ऐकून हायस वाटलं, मन प्रसन्न झाल्याची नव्याने पुन्हा एकदा त्यांना अनुभूती  येत होती...

पण आईचं मन इतक्यावर समाधानी होणार तरी कसं? ती माऊली समोर होऊन म्हणाली,"डॉक्टरसाहेब माझा कुमार काही बोलला का? भूक लागली असं विचारलं का? आई बाबा कुठे आहे? म्हणाला असेल "इतकं बोलून तिला सुख आणि दुःख अश्या मिश्र भावनेनं, चार पावलं अंतरावर असून मुलाची अशी विचारपूस करावी लागत असल्याने परत गहिवरून आलं...

तिच्या पापण्या ओलावल्या, आसवं गालावरून नकळत खाली ओघळले अन ती ते वाहणारे थेंब टिपणार इतक्यात सर्रकन ते आसवं फरशीवर खाली पडले... सर्व तिला आधार देत समजावीत होते, एकमेकांना दिलासा देत होते पण  प्रशांतच्या नजरेतून आईचे ते फरशीवर पडलेले आसवं सुटले नाहीत कुणाचंच लक्ष नाही हे जाणून त्याने खिशातला रुमाल बाहेर काढला आणि तसाच तो रुमाल त्या आसवांच्या थेंबावर नकळत पडला असं दाखवून आईचे अनमोल आसवं स्वतःच्या रुमालाने उचलून जणू मनात जपून ठेवले...

तिने जवळ घेऊन त्या माऊलीला खांद्याचा आधार देऊन मन मोकळं करू दिलं, काहीवेळाने भावनेचा ओघ ढळला मग तिला बाजूच्या खुर्चीत बसविले. इतक्या वेळात सगळे जण डॉक्टरला,"कुमारला भेटता येईल का?"म्हणून विचारत होते तर सध्या तरी त्याला आणखी आरामाची गरज आहे असं उत्तर ऐकून त्यांची जरा निराशा झाली.. पण तो ठीक आहे आणि लवकरच बरा होईल कळल्याने ते सारे समाधान लाभले आणि थोड्या वेळाने कुमारला भेटता येईल या आशेने ते सुखावले...

कुमारला आणखी काही वेळ आरामाची आवश्यकता आहे हे कळल्यावर सर्वजण परत आपापल्या जागी विसावले, सुजितने तिला मॅसेज करून बाहेर हॉलनजीक कँटीन मध्ये भेटायला बोलाविले, ती मॅसेज वाचून तेथून उठली आणि कँटीनमध्ये पोहोचली, सुजितने इथे का बोलावलं याचा अंदाज तिला आधी होताच... दोघांनी सोबत चहा घेतला पण विषयाला कुणीच हात घालेना तेव्हा पुढाकार घेऊन तिने विचारलं"सुजित, तू मला इथं का बोलावलं? काही प्रॉब्लेम तर नाही ना.."

तिने बोलायला सुरुवात केली, त्याला बरं वाटलं..."नाही, प्रॉब्लेम वगैरे काही नाही, सहजच..."

“सहज! डॉक्टर येण्यापूर्वी सुध्दा तुला काही तरी विचारायचं आहे असं वाटत होतं..."

रिकामा झालेला चहाचा ग्लास टेबलवर गोल गोल फिरवत, मध्येच दोन्ही हात टेबलवर ठेवून तळहात एकावर एक ठेवले"मी तुला, तुझ्या हँडबॅग मध्ये चुकून आलेलं नोटबुक येतेवेळी आणायला सांगितलं होतं..."

“अस्स ते होय, असेल की बॅगमध्ये"म्हणत तिने खांद्याला अडकवलेली बॅग टेबलवर ठेवली, आतमध्ये हात घालून तिने रिकामा हात बाहेर काढला... एक नजर सुजितला पाहिलं,"अरे यात तर नाहीये..."

“काय? डायरी बॅगमध्ये नाही..."सुजित जवळ जवळ ओरडला.

“अरे, जरा हळू बोल, आणि डायरी कसली?"सुजितने कुमारची डायरी वाचली तर नाही ना? म्हणून जरा चौकसपणे विचारलं..

“डायरी म्हणजे ते नोटबुक.."त्याने स्वतःला कसतरी सावरलं.

“तू मला फोनवर विचारलं होत ना, बॅगमध्ये ते नोटबुक आहे की नाही चेक कर म्हणून, बहुतेक तेव्हा बाहेर काढलं आणि मी परत बॅगमध्ये ठेवायला विसरले ..."

“अरे यार, ते नोटबुक घरीच राहिलं..! पण नक्की घरी आहे ना!”

“हो, मला खात्री आहे पण इतकं महत्वाचं असं त्यात काय आहे?”

स्वतःशीच - तर हिने अजून ती डायरी उघडून वाचलेली नाही असं वाटतंय”त्यात ना, माझ्या मित्रांचे, नातेवाईकांचे, डॉक्टर, इतर काही महत्वाच्या लोकांचे मोबाईल नंबर आणि पत्ते लिहिले आहे...”

“ठीक आहे, मी पुन्हा येतेवेळी आठवणीने नक्की सोबत घेऊन येईल...”

“बरं, ठीक आहे..”

इतकं बोलून ते तेथुन बाहेर पडले... फोन लावायच्या निमित्याने ती जरा मागे थांबली, सुजित मात्र जड मनाने पावलं उचलत पुढे निघून गेला... पण ती खरंच डायरी आणायला विसरली होती का? कि तिने डायरी कुमारची आहे समजल्यावर जाणीवपूर्वक घरी ठेवली असेल? तिने डायरी वाचायला तर घेतली नसेल ना? कदाचित पूर्ण वाचून झाली की काय? अजून कुणाला ते गुपित कळू नये म्हणून कुमार बरा झाला की त्यालाच परत करावी असं तिला वाटत असावं? अश्या अनेक प्रश्नांनी त्याला भंडावून सोडलं...

शेवटी बोलतांना त्याचा आवाज तिला किंचित निराश जाणवला, त्याच्या अश्या प्रतिसादाने तो खोटं बोलत असून त्याने डायरी वाचली असल्याचं तिला सहज कळलं... पण सारं काही माहीत असून तसं काहीच तो दाखवत नाहीये याच तिला नवल वाटलं, पुढच्या क्षणी तिला

स्वतः सुध्दा डायरी वाचलेली नाही असं दाखवून लपंडाव खेळत आहोत कळून चुकलं... पण हा खेळ कितीवेळ असाच सुरु ठेवावा लागेल? या अनपेक्षित प्रश्नाने तीच मन विचलित झालं, जमेल तितक्या लवकर घरी जायला हवं आणि राहिलेलं, आजच वाचून पूर्ण करावं लागेल जेणेकरून उद्या ती डायरी परत करता येईल... असं ठरवून ती कुमारच्या आई वडीलांजवळ जाऊन त्यांना भेटली, रूमच्या काचेतून कुमारला भिजलेल्या डोळ्यांनी पाहिलं... निघतांना सर्वांचा निरोप घेतला आणि सुजितला, एक महत्त्वाचं काम असल्याने आत्ताच बस स्थानक येथे सोडून द्यायला सांगितलं... त्याने तिला थांबविण्याचा निष्फळ प्रयत्न केला नाही, उलट तो लगेच तिला घेऊन बस स्थानक ला पोहोचला... तिला बस मध्ये बसवून तो तिथेच थांबला, त्याने अनिरुध्द ला फोन केल्यावर त्याला कळलं की...

जेव्हा आर्यन, अनिरुध्द आणि ऋतुराज पंक्चर दुचाकीला नवीन ट्यूब बसवून दवाखान्याकडे यायला निघाले असता ऋतुराजला घरी जरा काम असल्याने घरचा रस्ता धरावा लागला... ते तिघे दवाखान्याऐवजी घरी पोहोचले, बराचवेळ दुचाकी लोटत पायी चालत फिरल्यामुळे त्यांची चांगलीच घामाघूम झाली होती, अंगातील घामाने ओले झालेले कपडे ऋतुराजच्या घरी जाईपर्यंत कडक उन्ह आणि वारा यांच्या मेहरबानीने परत सुकले... पण अंग कसं रसरस झालं होतं म्हणून आणि आर्यन, अनिरुध्द इथं आल्यानंतर बॅग त्याच्याच घरी ठेवून गेलेले म्हणून अंघोळ आटपून घेण्याचा बेत आखला...

ऋतुराज येतांना तिघे सोबत असणार याची घरी कुणालाच कल्पना नव्हती म्हणून त्याच्या आईने त्यांना जरावेळ आराम करायला सांगून जेवण बनवायला सुरुवात केली... एका आईच्या हट्टापुढे या तिघांचं काहीएक चाललं नाही, नाईलाजाने त्यांनी आणखी काहीवेळ घरीच मुक्काम ठोकला... यामुळे ते अजून पर्यंत दवाखान्यात येऊ शकले नव्हते, मग सुजितने ती येऊन

परत गेली आणि तिने डायरी सोबत आणली नव्हती तर कामं असल्याने घाईघाईत जायला निघाली म्हणून मी तिला थांबविण्याचा आग्रह करू शकलो नाही असं फोनवर त्यांना कळवलं...

पण तरी आर्यन, अनिरुध्द आणि ऋतुराज, आम्हाला तिला भेटायचं होतं... डायरी का नाही आणली? ते विचारायचं होतं... काहीतरी शक्कल लढवून तिला थांबवायला हवं होतं, काय सुजित, तुला इतकं काम करायला जमलं नाही... असं ते सुजितला म्हणाले... आज तरी डायरी वाचायला मिळणार अशी त्यांना आशा होती पण आजही निराशाच त्यांच्या पदरी आली... त्यांना हि काही समजेना नियतीने हा कोणता लपाछपीचा खेळ चालवलाय..? कोण कोण या खेळात सहभागी आहेत अन कोण कोण आतापर्यंत बाद झाले आहेत किंवा होणार आहेत???

## ३५. भाग्य

सुजित बस स्थानक येथून दवाखान्यात परत आला तर आर्यन, अनिरुध्द आणि ऋतुराज सुध्दा इतक्यातच तिथं पोहोचले होते. एकमेकांशी नजरानजर झाल्यावर सुजितला त्याच्यावरचा राग त्यांच्या डोळयात दिसून आला... मग तो जवळ जाऊन,"दोस्तहो, मला माहित आहे तुम्हाला नक्कीच माझा राग आला असेल, पण खरंच माझा नाईलाज झाला होता असं नाही की मी विसरलो होतो, नाही मला तिला डायरीबद्दल विचारण्याचा मुळीच विसर पडला नव्हता, मी तिला एकांतात बसून व्यवस्थित विचारलं तर ती चुकून डायरी घरीच राहिली असं सांगत होती आणि तिला घरी जाणं खूप आवश्यक होतं म्हणून मी तिला थांबवू शकलो नाही. मी स्वतः तिला बस स्थानक येथे आत्ताच सोडून आलो... तरी तुम्हाला मी चुकीचा वागलो असं वाटत असेल तर मला माफ करा!"

ऋतुराज,"सुजित, माफी वगैरे मागू नको पण आम्ही तुझ्यावर नाराज आहोत.."

अनिरुध्द त्याला दुजोरा देत"हो बिलकुल मी सुध्दा नाराज आहेच, तिला सकाळी एकदा आठवण करून द्यायला हवं होतं..."

मध्येच आपलं मत मांडत आर्यन,"हो ना सुजित, कमीत कमी एक फोन केला असता तरी जमलं असत..."

अनिरुध्द आणि ऋतुराज एकसाथ,"नाहीतर काय? ते बाजूला ठेवून देऊ पण तिला 10 - 15 मिनिट सहज थांबवता आलं असत..."

मग सर्वजण बोलता बोलता जरा शांत झाले, जणू वास्तविकतेचा त्यांना विसरच पडला की कुमारचं कालच ऑपरेशन झालं, आज तर त्याची भेट सुध्दा कुणाला घेता आली नव्हती, अजून त्याच्याशी कुणाचंच बोलणं झालं नव्हतं हे एक आणि डायरीचं गुपित कुणालाच ठाऊक नसतांना सुजितला अचानक ते कळलं, त्याला ती डायरी वाचण्याचं भाग्य लाभलं अन आपणांस अजून पर्यंत ती डायरी एक नजर बघण्याचं भाग्य नाही हे दुसरं असे दोन कारण त्यांना वास्तव विसरून जायला टोकाची भूमिका बजावत होते... पण यांत त्यांचा काहीएक दोष नाही कारण इतरांना जे माहित आहे किंवा जे इतरांच्या भाग्यात आहे, इतरांना जे अनुभवता आलं.. ते आपण सुध्दा अनुभवावं, आपल्या भाग्यात यावं असं प्रत्येकाला वाटतं, हा आपल्या माणसांचा आणखी एक स्वभावविशेष म्हणावा लागेल... पण सारंच साऱ्यांच्या भाग्यात असतं असं नाही आणि समजा असेलच तर एकाचवेळी असण कसं काय  शक्य आहे..? आपण कितीही नाकारलं तरी जे जेव्हा ज्याच्या वाट्याला यायचं ते तेव्हाच येईल. भाग्य वगैरे काही नसतं तर जीवनात तशी वेळ, परिस्थिती निर्माण झाली की ज्याची त्याला प्रचिती येते.... इतकं मात्र खरं..!

सुजितनेच पुढाकार घेऊन बोलायला सुरुवात केली, शांततेच्या बुडबुड्याला शब्दाने टोचणी बसावी तसं शांततेच अस्तित्व संपलं..."काय आहे ना दोस्तहो, काही काही गोष्टी जेव्हा कळायच्या तेव्हाच कळतात, जेव्हा घडायच्या तेव्हाच घडतात... भाग्य लागतं असं म्हणतात ना! कदाचित माझ्या भाग्यात ती डायरी सर्वात आधी वाचणं असेल... भाग्यात असेल तर ते मिळेलच पण योग्य वेळ यायला हवी..."

हे ऐकून त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव किंचित बदलले, मनात काही प्रश्न अन सोबतच मित्राने इतकं भारी तत्वज्ञान ऐकवलं याचं त्यांना आश्चर्य वाटलं... जणू सुजित असं काही बोलेल याची त्यांना काहीएक कल्पना नव्हती तर तो भाग्य वगैरे गोष्टी सांगत होता यावर त्यांचा विश्वास बसेना असे मिश्र हावभाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटले... सुजितने एक दोनदा तिघांच्या नजरेला

नजर दिली मग ते तिघे जरा विचारात मग्न झाले कि नुसतेच फक्त तसं दाखवत होते याचा सुजितला संशय आला... त्याने आर्यनच्या खांद्याला हलकेच हलवून आवाज दिला,"आर्यन... आर्यन"

मला तुझं म्हणणं जरा पटतंय, कारण बघा ना, जर इतक्या दिवसांपासून ते डायरीचं गुपित उघड झालं नाही, अचानक कुमारचा अपघात झाला आणि ती डायरी सुजितला नकळत मिळाली.. त्याचं भाग्यच म्हणावं लागेल की कुमारच्या सहवासात असूनदेखील इतके दिवस लपवून ठेवलेलं रहस्य असं अनपेक्षितपणे कळलं...

आर्यन ला दुजोरा देत, अनिरुध्द"हो यार, आपण नेहमी दूर असून मोबाईल वर कुमारशी बोलायचो पण त्याने कधी कधी म्हणून डायरीचा विषय काढला नाही की असं काही लपवून ठेवण्यासारखं त्याच्या वाट्याला आलं कधी जाणवू दिलं नाही... आता जेव्हा नियतीने हा भलताच डाव मांडला आणि ते डायरीचं गूढ सुजितला कळलं, काय म्हणावं याला कुमारचा अपघात झाला हे दुर्भाग्य कि त्याच्या मनात जपून ठेवलेलं, डायरीत उतरवलेलं गुपित यानिमित्याने कळलं हे सौभाग्य..?"

अनिरुध्द च्या या प्रश्नाने सर्वांना विचार करायला प्रवृत्त केले, खरंच हा निव्वळ योगायोग होता की हे सगळं घडण्यामागे नियीतीचा आणखी काही हेतू होता...? कुणास ठाऊक? शेवटी मान्य किंवा अमान्य केल्याने कशाचं अस्तित्व असणं, नसणं ठरवता येत नाही तर वेळ आणि परिस्थिती माणसाला अनुभूती देऊन पटवून देतात...

ऋतुराज आतापर्यंत विचारातच बुडालेला होता आणि अनिरुध्द च्या प्रश्नाने तो आणखी गंभीरपणे विचार करत होता... मग एका क्षणाला त्याचं विचारचक्र थांबलं तो

म्हणाला,"तसा माझा अजिबात भाग्य वगैरे गोष्टी वर विश्वास नाही, मी मानतो ते फक्त कर्माला... जसे कर्म तसे फलित, आपल्याला डायरी वाचायला मिळाली असती जर सुजितने स्वतः ती बॅगमध्ये ठेवली असती तर, त्याने आकाशला ती डायरी बॅगमध्ये ठेवायला सांगितली आणि हा सगळा गोंधळ झाला..."

"बरं असो, जे झालं ते झालं, यावर वाद करून आता काहीएक उपयोग नाही तर कुमार आता कसा आहे? आपण इथं आलो पण अजून त्याची भेट घेतली नाही... चला तिकडे जाऊया..."म्हणत आर्यनने विषयांतर केले आणि सर्व जण रूमकडे जायला निघाले...

## ३६. का?

सुजित, आर्यन, अनिरुध्द आणि ऋतुराज सोबतच कुमारच्या वॉर्डजवळ पोहोचले. इतक्यातच डॉक्टर त्याच्या रूममधून बाहेर पडतांना त्यांना दिसुन आले, त्याचे आई वडील, आकाशचे वडील, सुजितचे वडील डॉक्टरशी बोलत होते, झपाझप चार पाच पावलं टाकत ते तिथं जाऊन ठेपले... डॉक्टर देवांश सांगत होते की,"कुमारची तब्येत आता बऱ्यापैकी चांगली आहे, तुम्ही त्याला भेटू शकता फक्त जास्त लोक एकसाथ जाऊ नका आणि त्याला त्रास होईल म्हणून जास्त बोलू पण नका.. समजलं ना, येतो मी.."

सर्वांच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर पसरली, आई वडिलांसह प्रशांतने रूमचे दार लोटून आत प्रवेश केला.. कुमार नजर रोखून त्यांना पाहत होता, माऊलीने जवळ जाताच त्याच्या चेहऱ्यावरून मायेने हात फिरवला..."कुमार, बाळा कसा आहे? फार त्रास होतो का? खूप लागलं ना.. भूक लागली का रे?"इतकं बोलून झालं अन तिचा कंठ दाटून आला आणि ती त्याला जवळ घेऊन रडू लागली, प्रशांतने कसतरी तिला सावरलं..

त्याचे वडील,"दादा, आता बरं वाटतंय ना, काही हवं आहे का? सांग तुझे आवडते अंगुर आणायचे का?"आपला थोरला मुलगा आज बरोबरीचा असतांना असा हतबल झालेला पाहून यावेळी त्यांनाही गहिवरून आलं...

प्रशांतने पुढे येऊन कुमारला पायापासून डोक्यापर्यंत एक दोनदा पाहिलं,"दादा, हे सगळं कसं काय झालं? तू तर नेहमी दुचाकी काळजीपूर्वक चालवतो... सगळं ठीक होईल, दादा"मागे वळून त्याने डोळ्यात जमा झालेले आसवं हातानेच पुसले...

कुमारचे डोळे किंचित आसवांनी भरून आले, पापण्या ओलावल्या, आसवं खाली ओघळणार इतक्यात त्या माऊलीने पदराने टिपून घेतले. तो काहीतरी बोलेल, आपल्या प्रश्नाचं उत्तर म्हणून दोन चार शब्द तरी बोलेल या आशेपोटी 10 -15 मिनिट ते तसेच शांततेने त्याला पाहत राहिले. पण कुमारने शब्दानेही प्रतिसाद दिला नाही, शेवटी मनातच, कुमार अजूनही का बोलला नाही? हा प्रश्न आणि डोळ्यात अश्रू घेऊन ते तिघे रूम बाहेर पडले...

ते बाहेर पडताच सर्वजण त्यांच्याजवळ जाऊन चौकशी करायला लागले आणि त्यांनी सांगितले की,"कुमार बरा तर वाटतोय पण काहीच बोलला नाही.."

आतापर्यंत त्यांना पडलेला प्रश्न इतर सर्वांच्या मनात अंकुरला, काहीवेळ कुणीच आत गेलं नाही, थोडा वेळ थांबून मग सुजितचे वडील, आकाशचे वडील, आकाश हे तिघे कुमारला पहायला आत गेले... त्यांनी कुमारला कसा आहेस? काही त्रास होत आहे का? लवकर बरा हो, काळजी करू नको आम्ही आहोत ना असा दिलासा दिला, नंतर तो काहीतरी बोलेल याची ते वाट पाहत काहीवेळ तिथेच थांबले पण त्याने काहीच प्रतिक्रिया न दिल्याने परत एकदा ' कुमार काहीच का बोलत नाही? ' हाच प्रश्न मनात घेऊन तेसुध्दा परतले...

बाहेर सर्व कुमार यावेळी तरी काही ना काही बोलला असेल या विचारात होते पण ते तिघे बाहेर आल्यावर त्यांचं उत्तर काही वेगळं नव्हतंच... मग काय करावे? आत जावं कि नाही असं सुजित, आर्यन, अनिरुध्द आणि ऋतुराजला वाटून गेलं. जरावेळ विचार करून अर्ध्या एक तास अजून थांबून नंतर भेटायचं असं त्यांनी ठरवलं.. मग ते कँटीनमध्ये जाऊन बसले, चहा पित असतांना... एक एक चहाचा घोट घेतांनी कुमार का बोलत नाही? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात घोळत होता...

सुजित,"खरंच कुमार मला मित्र मानत होता का? जर याच उत्तर हो आहेच तर तो निदान आतातरी बोलेल का?"

आर्यन,"सर्वांना आधार देणाऱ्या कुमार वर हि वेळ आली तरी का? पहिल्यासारखा कुमार परतून येईल का?"

अनिरुध्द,"बालपणीचे मित्र असून डायरी लिहिल्याचे लपवून का ठेवावं लागलं असेल? ते एक खाजगी म्हणून बाजूला ठेवलं तर सोनेरी क्षण हे परत एक गुपित का? मैत्रीचं नातं रक्ताच्या नात्याला मात देईल का?"

ऋतुराज,"कुमार नेमका कोण हे समजून घेणं कुणालाच कसं जमलं नाही? सगळ्यांत असून तो कुणातच नव्हता असंच काहीसं या सर्व गोष्टीवरून दिसत नाही का? त्याने एकदा मैत्रीच्या नात्याने मदत मागायला नको होती का?"

याशिवाय एक समान प्रश्न सर्वांच्या मनात होता,"निदान आपल्याशी मैत्रीच्या नात्याने बोलेल का ? आणि त्याचा अबोला संपेल का?"

मनातच असे विचार करत असता हातात घेतलेले चहाचे ग्लास कधी रिकामे झाले त्यांना कळलं नाही... एकमेकांकडे नजर फिरवत त्यांनी हातातील ग्लास टेबलवर ठेवले, मनात नकळत घर केलेले"का?"अजूनही मनाला बाजूला सारता येत नव्हते, इतक्यात एक 15 - 16 वर्षे वयाचा मुलगा हातात स्ट्रे घेऊन आला, टेबलवरचे रिकामे ग्लास त्याने उचलून घेतले आणि टेबलवर ग्लासमुळे पडलेले गोलाकार चहाचे डाग खांद्यावर ठेवलेल्या कापडाने पुसून काढले...

त्याचा निरागस, घामाने तवंग उमटलेला चेहरा पाहून त्यांच्या मनातील सारे प्रश्न जणू काही पळून गेले... या वयात हा मुलगा कामात गुंतलेला आहे, परिस्थितीने त्याच्याजवळ याशिवाय दुसरा कोणताच पर्याय ठेवला नसेल... पण तरी तो यावेळी हिमतीने आलेल्या परिस्थितीचा सामना करत आहे... तो मुलगा केव्हाच ग्लास घेऊन निघून गेला आणि जाता जाता या सर्वांना वास्तविकतेचा सामना करण्याचा एक धडा व जरासा दिलासा देऊन गेला, कॅंटीनच बिल चुकतं करून ते तेथून बाहेर पडले...

## ३७. स्वार्थ

कँटीन मध्ये पाहिलेला तो मुलगा आणि कुमार दोघेही त्यांच्या जीवनात आलेल्या परिस्थितीचा सामना करत आहे, आपण कुमारवर जे बेतलं ते बदलू शकत नाही तर निदान त्याच्या कुटुंबियांना आधार देऊ शकतो याचं समाधान मानून ते वॉर्डमध्ये पोहोचले. प्रत्येकाच्या मनात कुमारला काहीतरी विचारायचं होतं, पहिलं म्हणजे अपघात कसा झाला? आता कस वाटतंय? हे सर्वांना समान प्रश्न पडले होते तर सोबतच आजवर डायरीचं गुपित का लपवून ठेवलं? आमच्यावर, आपल्या मैत्रीवर तुला विश्वास नव्हता का? असे प्रश्न चारही जणांना वेढा घालून होते याशिवाय सुजितला पडलेला प्रश्न जरा वेगळाच होता, मैत्रीत, जीवनात वाटेला आलेलं सुख दुःख नेहमी वाटून घ्यायचं असतं तर कुमारने मीच नाही आणखी कुणाजवळ तरी व्यक्त व्हायला हवं होतं त्याऐवजी त्याने डायरी लिहिण्याचं का ठरवलं???

तर अनिरुध्दला पडलेला एक प्रश्न म्हणजे"कुमारने स्वतःबद्दल डायरीत जे लिहून ठेवलं त्याचबरोबर आमच्या चारही जणांकरिता ' सोनेरी क्षण ' हे  काय लिहून ठेवलं? आणि का? हि सुध्दा त्याच्या नजरेत एक अनपेक्षित गोष्ट होती... डायरी सोबतच सोनेरी क्षण याचा पण त्याने कुणालाच थांग पत्ता लागू दिला नाही...

आर्यन सुध्दा काही अश्याच विचारात मग्न होता आणि ऋतुराज सुध्दा... जरावेळ आणखी थांबून सुजित, आर्यन, अनिरुध्द आणि ऋतुराज कुमारला भेटायला त्याच्या रूममध्ये गेले... आत प्रवेश करताच त्यांची नजरानजर झाली, त्याच्या चेहऱ्यावरचे तेज जरा कमी झाले होते. त्याला जवळून पाहताच त्यांच्या लक्षात आले, काहीवेळ त्याला नुसतं निरखून पाहण्यात वेळ निघून गेला.."कुमार, आता कसा आहेस? बरं वाटतं ना?"सुजितने त्याला विचारलं आणि

कुमार त्यावर काहीतरी बोलेल या अपेक्षेने प्रश्नांना जरा विराम देत तो बोलायचा थांबला... सर्वांनी  कुमारकडे आशेने पाहिले पण त्याने काहीच प्रतिसाद दिला नाही. काही वेळ शांतता पसरली मग न राहवून आर्यन म्हणाला,"कुमार, तुला इतकं कसं लागलं? म्हणजे तुझा अपघात कसा झाला?"इतकं बोलून तोही त्याच्या उत्तराची वाट बघत थांबला. यावेळी त्यांना आशेची पुसट किरण नजरेस आली, कुमारने हात पुढे करून जराशीच पण ओठांची हालचाल केली,तो हळूच पुटपुटला म्हणून त्याचा आवाज कुणालाच ऐकू आला नाही...

त्याने पुढे केलेला हात हातात घेऊन अनिरुध्द त्याच्या जवळ बसला,"कुमार, बोल, तुला काय म्हणायचंय? काही हवंय का? त्रास तर होत नाहीये ना?"त्याला एकदम जवळून नजरेला नजर देत तो विचारू लागला, यावेळी त्याने मान वर उचलायचा प्रयत्न केला तेव्हा सर्वांनी मिळून त्याला तसाच पडून रहा, तुला आणखी त्रास होईल असे सांगत कसेतरी थांबविले.

अनिरुध्दने विचारलेल्या प्रश्नांना सुध्दा त्याने बोलून काहीही प्रतिसाद दिला नाही, सर्वांची निराशा झाली होती तरी सरतेशेवटी एक अखेरचा प्रयत्न म्हणून,"कुमार, हे अचानक काय झालं? काही तरी बोल, आज तुला या अश्या अवस्थेत पाहून आम्हाला काय वाटतंय तुला काय सांगू, काका काकू, प्रशांत तुझी खूप काळजी करताहेत, तु काहीतरी बोल.."ऋतुराज म्हणाला, यावर कुमार नक्की बोलेल हि अपेक्षा सुध्दा खोटी ठरली..

“आम्हा सर्वांना फक्त एकच वाटतं की तु लवकर बरा व्हावा आणि ज्या कुमारला आम्ही ओळखतो, जो मित्राच्या हाकेला धावून येतो, मदतीला सदैव तत्पर असतो, सर्वांचा आधार... तो कुमार आम्हाला हवा आहे..."सुजित सर्वांच्या मनातलं बोलला. इतकं बोलूनहि त्याने काहीएक प्रतिसाद दिला नाही तेव्हा सुजित भावूक झाला, नकळत एक अनामिक क्षणाला त्याच्या पापण्या ओलावल्या... त्याचे आसवांनी भिजलेले डोळे पाहून ते तिघे जण हि भावूक झाले, एकमेकांना

समजावत एकवार  त्यांनी कुमारला पाहिले.”सगळं काही ठीक होईल, तु काळजी करू नकोस..”ते रूम बाहेर पडले.

कुमारचे आई वडील, प्रशांत, सुजितचे वडील, आकाशचे वडील, आकाश ते चौघे बाहेर यायची वाट पाहतच होते पण त्याचे पडलेले चेहरे पाहून त्यांना न सांगता सर्वकाही समजलं... रूमपासून दूर एक कोपऱ्याजवळ जाऊन ते थांबले...”कुमार काही बोलतच नाही, किती सारं त्याला विचारायचं होतं..”आर्यन म्हणाला, त्याला दुजोरा देत सुजित,”हो ना, काय झालं? काही कळत नाही..”

अनिरुध्द,”मलाही त्याला विचारायचं होत, का त्याने डायरीबद्दल सर्वांपासून लपवून ठेवलं? आणि अजून बरंच काही...”पण त्याला भेटून काही माहिती करून घेता आला नाही, कुमार समोर असून मनातले सारे प्रश्न जसेच्या तसे राहिले...

अनिरुध्द,”तुझं म्हणणं मला कळतंय  पण कुमारवर जे बेतलं त्याची आपल्याला काहीएक कल्पना नाही आणि आता ह्याक्षणी तो ज्या परिस्थितीत आहे ती आपण पूर्णपणे अनुभवू शकत नाही...”

“पण निदान तो काहीतरी बोलायला हवा ना”आर्यन म्हणाला...”तो बोलेल नक्की बोलेल, त्याला बरं वाटलं की..”ऋतुराज आर्यनच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला.

जरावेळ सगळे शांत झाले, अनिरुध्द,”सुजित, तु तिला डायरी सोबत आण, असं फोन करून एकदा आठवण करून दिली असती तर आज तरी आम्हाला डायरी वाचायला मिळाली असती...”

“हे अगदी बरोबर आहे...”आर्यन आणि ऋतुराज दोघेही सोबतच बोलले...

“दोस्तहो, तुम्ही परत सुरु झाले का? ती उद्या येतेवेळी आणणार असं म्हणाली... आज ती डायरी आणायला विसरली त्यांत माझी चूक नाही आणि तिचीसुद्धा...”सुजित

“चूक कशी नाही, तिला आठवण करून द्यायची होती ना... म्हणे माझी चूक नाही...”आर्यन जरा रागात बोलला.

“नाहीतर काय? स्वतः डायरी हाती लागली, डायरीचं कुणालाच माहित नव्हतं, कुमारला न विचारता वाचून काढली आणि...”अनिरुध्द सुध्दा जरा मोठयाने बोलला...

त्यांच्याकडे एक नजर फिरवून “आपल्या मैत्रीच्या नात्याला स्वार्थीपणाचा स्पर्श तर झाला नाही ना? कारण यावेळी कुमार ची अशी अवस्था असून आपण त्याची डायरी, तो असं का वागला?, त्याने आपल्याला सांगितलं का नाही? हे महत्त्वाचं नाही तरी याचा विचार करतो आहे आणि वाद घालतो आहे.. कुमारने हे सर्व गुपित उघड केलं नाही यामागे नक्कीच काही कारण असेल असं तुम्हाला नाही का वाटतं...?”इतकं बोलून सुजित गप्प झाला.

जरावेळ विचार करून”सुजित, हो तुझं अगदी बरोबर आहे, यावेळी कुमार वर हि वेळ असतांना इतर गोष्टींना महत्व द्यायलाच नको, मी मान्य करतो माझं चुकलं, मला माफ कर मी तुझ्याशी रागावून बोललो...”

“होय, कुमारने जर डायरी लिहिल्याचे सर्वांपासून गुप्त ठेवलं तर त्यामागे नक्कीच कारण असेल किंवा त्याचाही नाईलाज असावा..”अनिरुध्द

“सुजित, आपल्या मैत्रीच्या नात्याला स्वार्थीपणाचा स्पर्श होता होता राहिला, तो वेळेवर आम्हाला सावध केलं...”ऋतुराज

“आता कुमार ठीक झाला आणि तो स्वतःहून जेव्हा कधी डायरीबद्दल सांगेल तेव्हाच मला ती डायरी वाचायची आहे नाहीतर नाही, जे गुपित त्याने काळजात तिजोरीबंद केलं ते त्याच्याजवळ राहो...”आर्यन

“मी सुद्धा यापुढे डायरीचा विषय काढणार नाही... कुमार स्वतः मला सांगेल तर मला त्यात जास्त समाधान मिळेल.. बस् कुमार लवकर बरा झाला पाहिजे...”अनिरुध्द

“मी काही असं म्हणणार नाही, मला नक्कीच ते डायरीचं गूढ माहित करून घ्यायचं आहे पण मी ते वेळेवर टाकून देतो जस सुजितला काहीएक कल्पना नसतांना अचानक ते कळलं तसं काहीसं माझ्याबाबतीत व्हायला पाहिजे नाहीतर मी सुद्धा स्वतःहून डायरी मिळविण्याचा आणि वाचण्याचा हट्ट करणार नाही... पण संधी मिळाली तर मी ती गमविणार नाही....”ऋतुराजच्या बोलण्याने ते जरा चक्रावले... काहीवेळ जुन्या आठवणी ताज्या करून सर्वजण कुमारच्या रुमकडे जायला निघाले...

वास्तविकता हि कल्पनेपेक्षा नेहमीच वेगळी असते तर कधी कधी अगदीच अनपेक्षित सुध्दा..! एखादी गोष्ट, व्यक्ती, परिस्थिती कल्पनेच्या आधारावर, विचारांचे पाढे वाचून किंवा तर्क वितर्क करून पूर्णतः समजून  घेणे शक्य नाही, म्हणूनच कित्येकदा नेहमी सहवासात असणारे लोक अचानक काहीतरी वेगळे वागले, बोलले कि मन ते मानत नाही आणि आपण म्हणतो ' तू

असं काही करशील किंवा वागशील असं मला कधीच वाटलं नव्हतं, मला तुझ्याकडून असं उत्तर अपेक्षित नव्हतं, मला तुला ओळखता आलं नाही, माझी चूक झाली कि तुझ्यावर विश्वास ठेवला...'

पण यांत समोरच्या व्यक्तीची पुर्णपणे चूक नसते, कारण बदल हा निसर्गाचा नियम आहे आणि वेळ, परिस्थितीचा माणसांच्या स्वभावावर, वागणुकीवर प्रभाव पडतो.. जे आज आहे, जसं आहे ते तसच्या तसं कायम राहील अशी अपेक्षा ठेवणं, खुळेपणाच आहे.. आपला स्वभाव हा कायमस्वरूपी नाही, माणसांची आवड हि वेळ, सहवास, पैसा आणि नजरेसमोरील पर्याय यामुळे बदलत असते... जे काय मिळवलं त्यापेक्षा आणखी सरस मिळविण्याची वृत्ती जन्म घेते, अपेक्षा दिवसेंदिवस वाढत  जातात... जर अपेक्षांची पूर्तता झाली तर समाधान मिळतं, पण ते कायम राहिल कि नाही हे त्या व्यक्तीवर अवलंबून असतं..

## ३८. बहर - निसटून गेलेले क्षण

ती तिच्या शहरात पोहोचली, लगबगीने चालत ती घरी आली, आवाराचे गेट उघडून ती अंगणातील तुळशी वृन्दावनाजवळ थांबली.  हँडबॅग मधून चावी काढून तिने कुलूप उघडलं नंतर दरवाजा... चावी काढतांना हातात घेतलेली हँडबॅग तिने हॉलमध्ये आल्याआल्या टेबलवर ठेवली, किचनमध्ये जाऊन तिने थंडगार पाण्याची बॉटल बाहेर काढली आणि ती बेडरुममध्ये शिरली, बेडवर बसून ती दोन चार घोट पाणी प्यायली, तिने साडीच्या पदराने चेहऱ्यावर आलेला घाम पुसला आणि पंखा सुरु केला, पटकन मागे वळून ड्रेसिंग टेबल जवळ आली आणि तिने डायरी हातात घेतली... ती वाचायला सुरुवात करणार तोच तिच्या मनात विचार आला,"मी अशी का वागले? सुजीतशी डायरी घरीच विसरले असं खोटं का बोलले? फक्त कुमार ने डायरीत लिहिलेलं वाचायचं राहून गेलं होतं म्हणून ना...? पण हा स्वार्थ नाही का? कितीतरी दिवसापासून, नाही वर्ष्यापासून गुपित असलेल्या कितीतरी गोष्टी कुमारने यांत लिहून ठेवल्या आहेत.... या डायरीबद्दल कुणाला काहीएक कल्पना नसेल,  पण इतक्या वर्ष्या नंतर हि डायरी मला मिळाली यामागे नक्कीच नियतीचा एखादा चांगला हेतू असावा..."असं म्हणत तिने स्वतःला समजावलं, तिने डायरी वाचायला सुरुवात केली...

*माझा बारावीचा निकाल लागला आणि दोन तीन दिवसांनंतर स्वतः घरी येऊन ती माझ्या सर्व नोट्स घेऊन गेली होती... माझी ग्रॅज्युएशन ला ऍडमिशन करायची गडबड सुरु झाली होती... मनात एक नवीन उत्साह होता पण सोबतच किर्तीप्रियाचं कॉलेज दुपारी आणि माझं सकाळी याची जरा खंत होती पण आता नाईलाज होता, म्हटलं असो, पुढल्या वर्षी तिलासुध्दा ग्रॅज्युअशनला ऍडमिशन केल्यानंतर सकाळीच कॉलेजला यावं लागेल, तेव्हा सोबतच जाता येता येईल... तिचं बारावीचं कॉलेज लवकरच सुरू झालं होतं आणि*

*निम्मा पावसाळा संपला, ऑगस्ट महिन्यात माझे पदवीचे वर्ग नियमित होत होते... पुन्हा एकदा नवीन शिक्षक, नवे मित्र आयुष्यात आले होते. बरंच काही नवीन शिकायला मिळत होते...*

*एक दिवस ११ ते १२ शेवटचा लेक्चर झाला नाही म्हणून मी लवकरच घरी जायला निघालो होतो, अर्ध्या रस्त्यात पाऊस सुरू झाला, आडोश्याला थांबावं म्हटलं तर जागा नव्हती म्हणून मी जोरात सायकल चालवत होतो... इतक्यात रस्त्याच्या दुसऱ्या बाजूकडून माझ्या पुढे मी तिला पाहिलं तर ती घरी परत जातांना दिसली, मी सायकलचा वेग वाढवला जरा जवळ जाताच तिला आवाज दिला..."किर्तीप्रिया..."तिने लगेच सायकल हळू चालवत मागे पाहिले. तोवर मी तिच्या अगदी जवळ पोहोचलो होतो.. पाऊस चांगलाच बरसत होता आणि आम्ही दोघेही पावसात भिजत होतो..."किर्तीप्रिया, काही घरी राहील का? परत जात आहे म्हणून विचारलं.."*

*"नाही रे, पावसाने भिजवलं ना आणि कॉलेजला जाईपर्यंत पूर्ण भिजले असते म्हणून म्हटलं, आज कॉलेजला जायचं राहू द्यावं..."*

*"अस्स झालं तर.."*

*"हो ना, बघ पाऊस वेळेवरच आला, अशी चिंब भिजून कॉलेजला कशी जाणार?"*

*“तुझं म्हणणं अगदी बरोबर आहे, घरी परत येतांना भिजलं तर काही फरक पडत नाही.”*

*“हं, पण तु कसा काय लवकर आला?”*

*“आज माझा शेवटचा लेक्चर ऑफ होता म्हणून..”चांगलं झालं असं मनातच बडबडलो.*

*तिच्याशी बोलत बोलत घरी आलो, आम्ही दोघेही पावसाने पुरते ओलेचिंब झालो होतो... तिच्या घराजवळ पोहोचलो तरी आज पावसामुळे कॉलेजला जात आलं नाही अशी तक्रार ती करत होती, मी मात्र त्याच पावसाला धन्यवाद देत होतो की ' तुझ्यामुळे आज आमचा संवाद घडून आला आणि तुझ्या निमित्याने आज तिची भेट झाली , तिला पावसात चिंब भिजलेलं आज पहिल्यांदा पाहिलं होतं. तिच्या चेहऱ्यावर थांबलेले पावसाचे थेंब तिची सुंदरता आणखी वाढवत होते...*

*त्यादिवसानंतर ती मनात अगदी खोलवर घर करून गेली, तिचं ते रूप जणू काही हृदयात ठसलं, असं का होत होतं? मला कळत नव्हतं... सिनेमा पाहून प्रेम म्हणजे काय ते समजलं होतं पण आमचं मैत्रीचं नातं कि प्रितीचं? हा प्रश्न तोपर्यंत मला पडला नव्हता... नंतरच्या दिवसात पाऊस पडला की ती पावसात भिजलेली किर्तीप्रिया नजरेसमोर यायची आणि अजूनही येते...*

*कॉलेजला जाण्या येण्याची वेळ वेगळी असल्याने तेव्हा भेट होत नव्हती, कधी कधी आठ दहा दिवसांनंतर ती दिसायची, पण घाई गडबड असली की नजरेसमोर असायची मग काय मनात असून देखील तिच्याशी बोलणं होत नव्हतं,ती किती किती दिवस दिसली नाही की मन बेचैन व्हायचं? का? कळत नव्हतं... काही दिवस निघून गेले सवय झाली, हळूहळू बोलणं कमी झालं होतं... मी कॉलेजच्या वातावरणात रमलो होतो. याच वर्षी आर्यन आणि ऋतुराज सोबत घट्ट मैत्री झाली होती.*

*एक दिवस असा उगवला कि तो मी कधीच विसरू शकत नाही, तिने स्वतःहून मला विचारलं होत की,"कुमार, आम्ही सहकुटुंब यात्रेला जाणार आहोत, तु सोबत येशील का?"मी लगेच होकार दिला होता, सर्वजण तयारी करून यात्रेला जायला निघालो, आधी देवदर्शन झालं, स्वयंपाक आणि जेवण असा बेत घरच्यांनी ठरवला होता म्हणून जेवण तयार होईपर्यंत आम्ही मनसोक्त यात्रा फिरलो, ती काहीही घेण्याआधी हे ' चांगलं दिसेल ना? घेऊ का? ' इतकं विचारत होती... तिचं सर्व खरेदी करून झाल्यावर मी तिच्या पसंतीचं"k"अक्षराचं लॉकेट माझ्यासाठी घेतलं होतं, सहजच.... त्यादिवशी दिवसभर घरून निघाल्यापासून परत येईपर्यंत भरपूर गप्पा आणि फिरणं झालं होतं, तिच्या परिवारासोबत चांगलाच परिचय झाला होता.*

*पावसाळा संपून हिवाळा सुरु झाला, नवरात्र उत्सव आला होता.. दसऱ्याच्या दिवशीची गोष्ट, मी सायकल धुवून पायदळ तिच्या घरासमोरून जात होतो, ती समोर आली, आज काहीतरी वेगळपण तिच्यात दिसत होतं मला सेकंदाचाही वेळ लागला नसावा तिने दोन लांबलचक वेण्या घातल्या होत्या आणि तिला खरंच खूप छान दिसत होत्या म्हणून ती आवाज देण्याची वाट न पाहता मी स्वतःहून तिथं थांबलो, तिने अंगणात रांगोळी काढली*

होती आणि रांगोळीचं ताट हातात घेऊन ती काढलेल्या कलाकृतीला पाहत होती, मी तिला आवाज दिला अन तिला मला वळून पाहिलं..

“कुमार, कधी आलास आणि कुठून?”

“मी आताच सायकल धुऊन येत होतो तर तु दिसली म्हणून थांबलो...”

“हो का?”

“छान दिसते आहे...”

“खरंच, खूप वेळ लागला हं रांगोळी काढायला...”

मनातच हिला कळलं नाही मी हिच्याबद्दल बोललो... लगेच तिला म्हणालो”रांगोळी पण छान दिसते आहे...”

“रांगोळीपण म्हणजे???”तिने विचारायला नको होतं..

तिने विचारलं म्हणून मीही न कचरता”तु आज दोन वेण्या घातल्या ना,खूप छान दिसते आहे...”

*“थँक्स, पण तु थट्टा तर करत नाही ना?”*

*“नाही, मी थट्टा करत नाही, का बरं?”*

*“आईने सकाळपासून कितीदा म्हटलं की काय लहान मुलीसारख्या दोन वेण्या घातल्या... म्हणून”*

*“खरं सांगतोय तू छान दिसत आहे... बरं येतो मी..”म्हणत मी सायकल घेऊन घरी जायला निघालो पण जोपर्यंत ती दिसेनाशी झाली नाही मी तिला मागे वळून पाहत राहिलो आणि ती जागीच उभी राहिली होती...*

*त्याचदिवशी सायंकाळी घरी सर्व वडील मंडळींना आपट्याची पान सोनं वाहून मी आशीर्वाद घेतला, इतर नातेवाईकांना, शेजाऱ्यांना, मित्रांना सोनं भेट करून दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या... सर्वांना भेटून झालं होतं आणि बराच वेळ झाला होता पण तिला भेटून सोनं आणि शुभेच्छा द्यायच्या राहिल्या होत्या. हो नाही करत तिच्या घरी गेलो, तिच्या घरी जाऊन सर्वांना सोनं दिलं पण ती घरी नव्हती.. मी जरा निराश होऊन परतनार होतो इतक्यात ती आली,”कुमार,happy Dasara”म्हणत तिने सोनं म्हणून द्यायचं ते आपट्याची पण माझ्या हातात देत हातात हात मिळवला.. मी तिच्या हसऱ्या आणि मनमोहक चेहऱ्याकडे पाहतच राहिलो, नवीन कपडे परिधान करून तिने पूर्ण साजशृंगार केला होता फक्त सकाळी घातलेल्या दोन वेण्या जशाच्या तश्या होत्या. तिने हात हवेत उंच करून माझ्या नजरेसमोरून हलविला”कुमार, कुमार”मी भानावर आलो, तो तिच्या आवाजाने नाही तर तिच्या नजरेसमोर हात हलवून बांगड्यांचा आवाज झाला म्हणून असं मला*

*अजूनही वाटतंय... तेच मी जरा ओशाळलो होतो, स्वतःला कसतरी सावरून मी तिला शुभेच्छा दिल्या, पण तिच्याशी गप्पा मारायचा मोह मला आवरता आला नव्हता मी चक्क रात्रीचे जेवण करायचा होतो तरी १० वाजेपर्यंत गच्चीवर बोलत बसलो होतो...*

*रात्री उशिरा घरी जाऊन जेवण केलं होतं आणि झोपायला सुध्दा वेळ झाला होता पण झोप येत नव्हती, तिचा तो हसरा आणि सुंदर, दोन वेण्या घातलेला चेहरा नजरेसमोर येत होता. तिच्याशी बऱ्याच दिवसांनी इतकं मनमोकळं आणि हवंहवंसं बोलणं झालं, बऱ्याच उशिरा झोप लागली पण बंद डोळ्यासमोर आज तिचं दिसत होती, स्वप्नात तिचं येणं हे माझ्यासाठी नवीन होतं.. सकाळी उठून लवकर तयारी करून कॉलेजला गेलो होतो, आयुष्य अजून आनंदाने न्हाहले कि काय असं वाटलं होतं, परत आल्यावर कबीरला रोज भेटायचो पण आज त्याला भेटण्यामागे विशेष कारण होतं, कितीतरी दिवसांनी तिच्याशी बोललो हे कबीरला जाऊन सांगायचं होतं आणि तिचं काल पाहिलेलं सुंदर रूप वास्तवात आणि स्वप्नातही... कबीरला जाऊन मी जवळ जवळ मिठी मारली आणि त्याला सगळं सांगून टाकलं मला मन आणखी आनंदी झाल्याचं जाणवलं...*

*दसरा झाला पाठोपाठ दिवाळी सण आला आणि कॉलेजला दिवाळीच्या सुट्या सुरू झाल्या होत्या. घरी साफसफाई आणि रंगरंगोटी केली होती, मी बाकी घरच्या कामात मदत करत होतो. असंच एक सायंकाळी... मी सुजितला भेटून घरी येत होतो आणि ती मला दिसली, तिच्याकडे नजर फिरवली तर तिने हसतच मला हात वर करून थांबवलं.. मी थांबलो, तिने गर्द गुलाबी आणि निळया रंगाचा पंजाबी ड्रेस घातला होता ज्यावर पूर्ण गर्द निळया रंगाची ओढणी असा तिचा पेहराव होता...*

*“किर्तीप्रिया, काय झालं? का थांबवलं?”*

*“कुमार, तु या सुट्टीत काय करत आहे?”*

*“घरची काम, बाकी विशेष असं काही नाही.. का बरं?”*

*“मला तुझी मदत हवी आहे...”*

*“बोल ना, काय मदत हवी आहे?”*

*“दिवाळीच्या सुट्या संपल्या कि लगेच आमची सराव परीक्षा घेतली जाईल म्हणून जरा वेळ काढून मला अभ्यासात मदत करशील का?”*

*“ठीक आहे ना, त्यात काय एवढं?”*

*“बरं तुला वेळ मिळेल तेव्हा १ ते २ तास घरीच येत जा...”*

*“चल, भेटू नंतर, येतो मी...”म्हणत मी सायकल घेऊन घरी आलो.*

*मग काय रोज दुपारी नाहीतर सायंकाळी तिला अभ्यासात मदत करायची म्हणून तिच्या घरी जाणं व्हायचं, कधी परत यायला वेळ पण व्हायचा... इतक्यात माझ्यात*

एक बदल झाला होता, तिने कोणता ड्रेस घातला, तिने केसांची वळण कशी केली, रोजच्यापेक्षा जरा लहान किंवा मोठी टिकली जरी तिने लावली कि माझ्या सहज लक्षात यायचं किंवा मी तिचं बोलणं, वागणं, हसणं, सजणं सगळं कधी केव्हा मनात जपायला लागलो मला कळलं नाही, तिच्यात होणारा बदल मी जणूं एक नजरेत समजायला लागलो होतो... तिचा प्रत्येक पेहराव मनात फोटो काढून जतन करावा असं वाटून जायचं, तिच्या सहवासात असतांना वेळ अशीच थांबून रहावी असंही वाटायचं... पण का? हे काहीकेल्या उमजत नव्हतं...

दिवाळीचा दिवस उगवला, मी सकाळीच कबीरला भेटून आलो होतो, प्रत्येक गोष्ट फक्त आणि फक्त त्यालाच ठाऊक होती.. माझा जिवलग मित्र"कबीर"दिवाळी निमित्त मी त्याच्या आजूबाजूचं सर्व गवत काडी साफ केलं होतं... आमचं मैत्रीचं नातं जरा वेगळंच होतं.

कॉलेजच्या सुट्या संपल्या आणि परत एकदा जसाच्या तास दिनक्रम सुरु झाला, माझं सकाळी आणि तिचं दुपारी कॉलेज... कधी कधी आठ दहा दिवसांनी तिची भेट व्हायची, थोडसच बोलणं व्हायचं. तिचं बारावीचं वर्ष होतं म्हणून ती मन लावून अभ्यास करत होती, सायंकाळी तिच्या घरासमोरून माझी चक्कर व्हायची पण ती नजरेस येत नव्हती... मन जरावेळ नाराज व्हायचं... का? या प्रश्नाचं उत्तर शोधायचा मी प्रयत्न केला नव्हता.

असंच जरा आनंद, नाराजी, नवे मित्र आणि जुन्या आठवणी जमा करून ते वर्ष संपलं, नवीन वर्ष सुरु होणार होत, यावेळी मात्र मी ग्रिटींग कार्ड बनवायचं नाही असं

*ठरवलं होतं आणि तिला भेटूनच नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा द्यायच्या असा मनात विचार केला होता... म्हणून सकाळीच लवकर उठून तयार झालो, तिला जाऊन भेटलो आणि दोघांनी एकमेकांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या... मी खुश होतो की नवीन वर्ष्याची सुरुवात छान झाली, कॉलेजचं गॅदरिंग असल्याने सर्व विद्यार्थी एकाच वेळी परिसरात गोळा झाले होते, दिवसभर एकापेक्षा एक असे नाट्य, नृत्य, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, संपूर्ण दिवस मौजमजा केली... कार्यक्रम संपला, परत येतेवेळी आम्ही सोबतच घरी आलो होतो, त्यादिवशी तिने पांढराशुभ्र ड्रेस ज्यावर फिकट केशरी रंगाचे फुलं होते, तिने कपाळावर कुंकवाचा लहानसा शोभेल असा टिळा लावला होता आणि ती त्या ड्रेसमध्ये खूपच सुंदर दिसत होती पण मी माझे शब्द आवरले.... मनात असून तिची स्तुती केली नाही, तिच्याशी बोलत बोलत सायकल चालवत होतो, कितीतरी वेळा ओठांवर आलं की तिला म्हणावं"कितीप्रिया, आज तू खूप सुंदर दिसत आहे..."पण मनातील भाव शब्द बनून ओठांतून बाहेर येत नव्हते... असं आधी केव्हाच झालं नव्हतं आमची मैत्री इतकी घट्ट झाली होती की एकमेकांशी बोलतांना विचार करायची वेळ यापूर्वी माझ्यावर कधीच आली नव्हती, मग आजच का असं होत होतं? मला काहीएक कळत नव्हतं... सरतेशेवटी अंतर संपलं आणि आम्ही घरी पोहोचलो, सायकल अंगणात उभी करून तसाच कबीरजवळ गेलो,"कबीर, कबीर... तुला परत एकदा नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा..!"त्याने आपल्या हिरव्यागार पानांचा सळसळ असा आवाज करून जणू मला प्रतिसाद दिला होता. मग मी त्याला टेकून जरा वेळ बसलो...*

*"कबीर, इतक्यात माझ्यासोबत काय होत आहे आणि का? काहीही कळत नाहीये. ती समोर असली की मी सारं काही विसरून फक्त आणि फक्त तिला पाहत असतो, तिच्या प्रत्येक गोष्टीच निरीक्षण करत असतो, ती समोर असली की तिला पाहतच राहावं असं होऊन जातं.... तीच बोलणं ऐकत राहावं आणि हि वेळ अशीच थांबून राहावी, वेळ*

समोर जाऊच नये असं वाटतं, कधी मनसोक्त तिच्याशी बोलतो तर कधी शब्दाने बोलायला जमत नाही... आजचं उदाहरण बघ ना, तिने मस्त पैकी केशरी रंगाचे फुलं असलेला पांढरा शुभ्र ड्रेस घातला होता आणि ती खूप छान दिसत होती पण तिला मी तसं सांगू शकलो नाही... का? हा प्रश्न आज मला पडला. पहिल्यांदा मनातलं तिला सांगतांना शब्द ओठांतून बाहेर पडले नाही आणि तिला नुसतंच पाहत होतो..."कबीरला सांगितल्यावर जरा मन हलकं झालं होतं पण तो प्रश्न तसाच होता आणि महिनाभर तसाच राहिला...

नवीन वर्षाचा पहिला महिना, जानेवारी सर्रकन निघून गेला आणि फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात मला पडलेल्या प्रश्नाचं उत्तर मिळालं. महिन्याच्या पहिल्या तारेखेपासूनच वेलेन्टाइन डे ची चर्चा सुरू झाली होती आणि तेव्हाच मलाही यादिवसाबद्दल नव्यानेच माहिती मिळाली, एकमेकांवर प्रेम करणारी मंडळी यादिवशी आपलं प्रेम गुलाबाचं फुलं देऊन व्यक्त करतात हे हि कळलं होतं पण माझ्या आणि तिच्या मधील नातं नेमकं कोणतं? याबद्दल मी जरा साशंक होतो... हि शंका दूर करणं मला आवश्यक वाटलं ते म्हणजे तेव्हाच नवीन वातावरण आणि तरुणाईचा उत्साह पाहून... असंच एक दिवस वर्गात लेक्चर ऑफ असतांना ग्रुपमध्ये पिवळा आणि लाल गुलाब याचे संकेत मित्रांच्या चर्चेतून समजले की मैत्रीसाठी पिवळा गुलाब आणि प्रेमासाठी लाल गुलाब... तेव्हा माझी शंका जरा कमी झाली जोपर्यंत नेमकं प्रेम प्रकरण काय ते कळत नाही ना तोपर्यंत आपली मैत्रीचं जिंदाबाद!!! वेलेन्टाइन डे ला तिला शुभेच्छा सह पिवळा गुलाब द्यायचा मी ठरवलं होतं, पण यावेळीही माझं दुर्दैव आड आलं आणि ती त्यादिवशी कॉलेजला आलीच नव्हती, तिच्या घरी जाऊन तिला भेटणं मला योग्य कि अयोग्य ठरवता आलं नाही आणि अगोदर तिच्यासाठी बनवलेल्या दोन ग्रिटींग कार्ड च्या सोबतीला ते फुलं पण सामील झालं... परत एक आठवण म्हणून... काही दिवसांनी ते फुलं कोमेजलं, सुगंध उडून गेला, मग ते फुलही सुकलं... तिला द्यायचं म्हणून निवडलेलं ते पहिलं गुलाबाचं फुलं... त्याला

*असंच गमावणं मला आवडलं नव्हतं, म्हणून एक प्लास्टिकचे पारदर्शी पाकीट बनवून मी त्यात ते जपून ठेवलं होतं... ग्रिटींग कार्ड ठेवलेल्या बॉक्समध्ये आणि मनाच्या एका खोल कप्प्यामध्ये.....*

*दरम्यान कॉलेजच्या सराव परिक्षेला सुरुवात झाली होती, परीक्षा संपली... होळीचा सण आला, दुसऱ्या दिवशी रंगपंचमी होती... मनात गेल्या वर्षीची आठवण ताजी झाली होती, तिची कशी गंमत केली होती आठवून एकटाच हसत होतो... त्या आठवणीतच मनात विचार होता की उद्या परत एकदा तो क्षण अनुभवायला मिळेल का? कि आणखी काही नवीन गोष्ट नशिबात आहे की काय? पण कुणी मला रंग लावेल म्हणून मी दिवसभर बाहेर पडलो नाही आणि तिची माझी भेट झाली नाही... बारावीची अखेरची परीक्षा घेतली जाणार होती, तेव्हा तिला अभ्यासात मदत करायला म्हणून अधून मधून भेट व्हायची... लवकरच परीक्षा संपली आणि सुट्ट्यांना सुरुवात झाली होती...*

*तर इतक्यात एक अनपेक्षित गोष्ट घडली होती, एप्रिल महिना... तिचा वाढदिवस मला आठवण होता आणि गेल्या वर्षी झालेली माझी फजिती सुध्दा, पण तरीही यावेळेस तिला शुभेच्छा देण्यासाठी मन आतुर झालं होतं, गेल्या वर्षी बनवलेलं ग्रिटींग कार्ड एक नजर पाहिलं ते अगदी जसंच्या तसं होतं पण एक आठवण म्हणून मी जपून ठेवलं होतं... म्हणूनच ते यावेळी तिला द्यायचं मी टाळलं आणि पुन्हा त्यापेक्षा सुंदर असं ग्रिटींग कार्ड बनवलं, तो दिवस उजळण्याची वाट पाहत होतो... तिला किती आनंद होईल अशी कल्पना मनात अकुंरली पण परत एकदा माझं दुर्भाग्य जिंकलं, सकाळी लवकर तयार होऊन तिच्या घरी जाऊन तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी गेलो तर दाराला कुलूप लावलं होतं.. ती कुटुंबासह आदल्या दिवशी संध्याकाळीच बाहेरगावी गेल्याच समजलं, उदास मनाने*

*परतलो, मन कश्यातच रमत नव्हतं म्हणून ते कार्ड घेऊन कबीरजवळ गेलो कितीतरी वेळ त्याच्या आडोश्याला बसून राहिलो होतो, पुन्हा पुन्हा ते ग्रिटींग नजरेसमोर धरत होतो आणि नशिबाला दोष देत होतो... तासनतास तसाच बसून राहिलो, एकवेळ अशी आली की सारं काही असह्य झालं, मन पहिल्यांदा दुखल्याची जाणीव झाली होती, मी सरसर झाडावर चढलो, जणू कबीरच्या खांद्यावर डोकं ठेवून ते दुःख, ती वेदना कमी होईल, असं वाटलं होतं पण जे झालं अगदीच अनपेक्षित होतं...*

*झाडाच्या सर्वांत उंच फांदीवर हात जाईल तिथं मी उभा राहिलो, मनात कोणताच विचार नव्हता, फक्त आणि फक्त एकच गोष्ट होती ती म्हणजे प्रत्येकवेळी वाटेला आलेलं अपयश..! तेव्हा नकळत मी अंगठ्याच्या वाढलेल्या नखाने कुणाच्याच नजरेत येणार नाही इतक्या उंचावर तिचं नाव कोरलं, कितीतरी वेळ तिथेच बसून त्याकडे पाहत होतो आणि वारंवार नखाने कोरून अजून खोल ते नावं ठळक केलं होतं.... काही वेळ असाच निघून गेला, मी असा का वागलो? माझं मलाच कळेना पण मन जरा शांत झालं होतं... त्यादिवशी संध्याकाळ झाली तरी घरी परतलो नव्हतो... सोबतच तिच्या आणि माझ्या नात्याची मला नव्याने ओळख झाली होती... मैत्रिपलीकडे आपलं नातं जुळलं याची जाणीव मला झाली होती आणि त्यानिमित्याने तिच्या, माझ्या जवळच्या आठवणीत आणखी एक भर पडली होती...*

*सूर्यास्त होऊन चांगलाच अंधार पडला होता मग मी घरी आलो, मनात कितीतरी गोष्टी एकामागून एक येत राहिल्या... तिने जाण्याआधी एकदा जर मला सांगितलं असत तर कालच एक दिवस आधी तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या असत्या, कमीत कमी पुन्हा माझ्यावर हि वेळ आली नसती, तिने मला शब्दानेही न सांगता असं अचानक*

*जाणं बरोबर नव्हतं, तिने खरंच चूक केली आणि मन मात्र माझं दुखावलं, यावेळी तिचा खरंतर खूप राग आला होता, समोर असती तर तो राग कदाचित व्यक्त झाला असता पण तीच सुदैव ती नजरेसमोर नव्हती आणि आता तर तिच्याशी बोलायचं नाही असंही एक दोनदा मनात येऊन गेलं... ती रात्र विचारात गढून गेली, दुसरा दिवस उगवला, मग तिसरा... चौथा... अन संपूर्ण आठवडा भर्रकन निघून गेला पण ती अजूनही परत आली नव्हती एव्हाना तिच्यावरचा राग केव्हाच उडून गेला होता आणि कधी एकदा ती नजरेस येते असे होऊन गेलं होतं.. इतक्या दिवसात असं कधीच झालं नव्हतं प्रत्येक क्षणाला मन तिला आठवत होतं, तिच्यासोबत असतांना जे क्षण जगलो ते एकांतात पुन्हा पुन्हा मनात येत असत... मी डोळे मिटून हरवून जायचो, कधी घरी तर कधी कबीरच्या सहवासात...!*

*मनात असलेली शंका पूर्णपणे दूर झाली होती आणि मैत्रीचं नातं प्रितीत बदललं या वास्तवाशी ओळख पटली होती... हि नवी जाणीव खरंच खूप छान, हवीहवीशी, प्रेरणा देणारी अन प्रत्येक वेळी उत्साही ठेवणारी मला वाटली होती... असाच सायकल घेऊन सहज बाहेर पडलो होतो आणि मला चाहूल लागली की ती समोर आहे, माझ्यापासून ती बरेच लांब होती, अंगण झाडतांना, तिचा चेहरा मला दिसला नव्हता पण मला जाणवलं की ती"किर्तीप्रिया"आहे... मी पटकन तिच्या जवळ जाऊन थांबलो,"किर्तीप्रिया..."मी तिला आवाज दिला तिने वळून मला पाहिलं"कुमार, बोल कसा आहेस..?"मी कित्येक दिवस झाले तिला पाहिलं नव्हतं म्हणून मी तिला बघतच राहिलो, तिच्या आवाजाने मी भानावर आलो,"कुमार... कुमार.. कुठे हरवला?"*

*"नाही, कुठे नाही... तु सांग बरेच दिवस झाले दिसली नाही..."*

*“आम्ही सर्व गावी गेलो होतो, मावशीच्या लग्नाला...”*

*“अच्छा, असं होय... सहज विचारलं जवळपास एक आठवडा उलटून गेला तरी दाराला कुलूप होतं...”*

*“हो, बरेच दिवस झाले आम्ही गावी गेलो नव्हतो, लग्नाच्या निमित्याने सर्वांच्या भेटी झाल्या आणि माझी परीक्षा झाली होती म्हणून मुक्काम लांबला...”*

*“छान झालं... मला वाटलं होतं की तुम्ही येथून दुसरीकडे राहायला गेले की काय?”*

*“काय, तु पण ना कुमार, इथे कसला त्रास आहे? दुसरीकडे जायला कश्याला हवं?”*

*“आपलं सहज विचारलं... बाकी काय म्हणतेस अजून?”*

*“लग्नात खूप मज्जा आली, सर्व खूप छान आणि व्यवस्थित पार पडलं...”*

*“मला सांगायचं होत, मी पण सोबत आलो असतो...”*

*“आल्याबरोबर तुझी थट्टा सुरु झाली का..?”*

*“थट्टा मुळीच नाही, खरंच मी आलो असतो पण तु मला विचारलं नाही...”*

*“असू दे, तु इतके दिवस आमच्यासोबत थोडीच हं राहिला असतास...”*

*“नक्कीच राहिलो असतो, तु असल्यावर आणखी काय हवं होतं?”*

*“हो का? मी आठवडाभर नव्हते तेव्हा काय केलं?”*

*' तुला खूप आठवण केलं..' हळूच म्हणालो होतो तिला ऐकायला जाणार नाही असं..*

*“काय म्हणाला? कळलं नाही..”*

*“काही नाही, तु नव्हती ना तर बोलायला कुणी नव्हतं, आठवडाभर खूप कंटाळा आला होता...”*

*“तुला मीच सापडते का रे थट्टा करायला?”*

*“दुसरं नाहीच ना कुणी तुझ्याविना, तुच एकमेव...........”*

*“म्हणजे काय? वाक्य तर पूर्ण कर...”*

*“काही नाही...”*

*“ठीक आहे, बरीच काम करायची आहे, नंतर बोलू..”ती हसतच बोलली मन प्रसन्न झालं होतं...*

मध्येच अचानक फरशीवर ग्लास पडल्याचा आणि पाठोपाठ म्याऊ म्याऊ असा आवाज तिला ऐकू आला, कुमारची डायरी वाचण्यात लागलेली तिची समाधी भंग पावली... ' मांजरीने किचनमध्ये काय लग्न लावलं कुणास ठाऊक? ' स्वतःलाच विचारत तिने हातातील डायरी तिथेच बेडवर ठेवली, ती किचनकडे जायला बेडरूम मधून बाहेर पडली...

## ३९. सोबती - जुने कि नवे

ती विचार करत झपाझप पाच सहा पावलं टाकत किचनमध्ये शिरली. तिने फरशीवर पडलेला ग्लास उचलून  ओट्यावर ठेवला, मांजर उपद्वाप करून कुठे लपली ते पाहायला लागली पण मांजर काही तिच्या नजरेस आली नाही... तरी काहीतरी आवाज करून, कुठे कोपऱ्यात लपून बसली असेल तर पळून जाईल म्हणून तिने एक दोनदा हाकलून द्यायचं म्हणून प्रयत्न केला, जरावेळ हालचाल होते का ते पाहून तिने फ्रीज उघडला आणि थंडगार पाण्याची एक बॉटल बाहेर काढली... दोन तीन घोट पाणी ती तिथंच प्यायली, मांजर बहुतेक निघून गेली असावी असा विचार करून ती बॉटल सोबत घेऊन परत बेडरूमध्ये आली... बराचवेळ एकाच ठिकाणी बसून वाचण्याचा तिला जरा कंटाळा आला म्हणून तिने बेडवर ठेवलेली डायरी हातात घेतली, दारातून बाहेर पडतांना तिने पंखा बंद केला आणि ती हॉलमध्ये सोफ्यावर येऊन बसली... तिने एका हातातील पाण्याची बॉटल टेबलवर ठेवली, डायरी वाचायला सुरुवात केली...

*माझी ग्रॅज्युअशनच्या पहिल्या वर्षाची परीक्षा झाली आणि कॉलेजला सुट्टी लागली होती... पुन्हा एकदा सुट्टीचा आनंद होता पण उन्हात भटकंती करून आंबे आणणे, दिवसभर सायकली फिरवणे आणि काही जुने छंद तितके सुटले होते , पुस्तक वाचणे, सिनेमा पाहणे आणि कबीरला भेटणे ह्या गोष्टी मात्र अजून तरी तश्याच होत्या... एक बदल झाला होता तो म्हणजे माझ्या वागणुकीत, आता तिला भेटल्यावर पूर्वीसारखं काहीच राहिलं नव्हतं, ती बोलत असतांना तिचा प्रत्येक हावभाव मी जोपासत होतो, तिचं बोलणं, हसणं, राहणं  सगळं सगळं हवंहवंसं आणि कितीतरी जास्त आवडायला लागलं होतं... तिला नुसतं बघत राहावं असं वाटायचं, मी काहीएक विचार न करता तिला डोळे भरून पाहत राहायचो... ती बोलत बसायची मी नुसतंच ऐकत राहायचो,*

बोलता बोलता ती मध्येच एखादी चापट मारून म्हणायची,"कुमार, इतक्यात तु जरा शांत नाही का झाला ? आपण सोबत असतांना नुसतं मीच बोलत असते..."त्यावर तिला सांगावंसं वाटत होतं की तुझं असं बिनधास्त बोलणं, मध्येच हसणं मला खूप आवडतं म्हणून मी बोलत नाही... तू बोलत असताना तुला बघत राहावंसं वाटतं..! पण तिच्यासमोर ओठांतून शब्द बाहेर येत नव्हते आणि मी तिला"सहजच"असं उत्तर देऊन मोकळा व्हायचो... रोज नवनवीन पुस्तक वाचणं, सिनेमा बघणं, कबीर आणि किर्तीप्रिया सोबत तास तास भर गप्पा मारणं या दिनक्रमात सुट्ट्या कमी कमी होत होत्या...

एक दिवस तोही उगवला, बारावीचा निकाल लागला होता... मला तिचा निकाल आधीच कळला होता कारण तिचा दहावीचा निकाल जाहीर झाला तेव्हा जी योजना आखली होती तिच यावर्षी सुध्दा..! तिचा रोल नंबर मी तिच्या नकळत मिळवला होता आणि तिच्याआधी सायबर कॅफेवर जाऊन मी निकाल बघितला होता, ती बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाली होती... तर यावेळी तिला तसं माहित होऊ न देता तिच्याकडून पेढे खाऊन तोंड गोड केलं... तिला शुभेच्छा दिल्या होत्या , ती बारावी उत्तीर्ण झाली याचा मला तिच्यापेक्षा किती तरी जास्त आनंद झाला होता, कारण ती सुद्धा आता ग्रॅज्युअशन ला प्रवेश घेणार आणि तिचं कॉलेज सुध्दा माझ्यासोबतच सकाळी असणार... काही दिवसांनी माझा पहिल्या वर्षी चा निकाल जाहीर झाला, यावेळी मी चांगल्या टक्के मिळवून वर्गातून प्रथम क्रमांक पटकावला होता आणि मनी आनंद मावत नव्हता... घरी, वस्तीत सर्वांनी खूप खूप कौतुक केलं होतं आणि मी त्यांच्या आशीर्वाद व आपुलकीनं सुखावलो होतो. त्यादिवशी तिला भेटलो, तिनेही शुभेच्छा दिल्या, नंतर कबीर जवळ जाऊन निवांत बसलो,"कबीर, दोस्ता आज मी खूप खुश आहे, वर्गातून पहिला आलो म्हणून आणि घरच्यांची स्वप्न साकार करण्याची क्षमता माझ्यात आहे याची जाणीव झाली म्हणून... थोड्या वेळापूर्वी तिला भेटलो, तिने मला शुभेच्छा देत म्हटलं"तु

*खूप हुशार आहे"असं जेव्हा तिने म्हटलं तेव्हा जे वाटलं ते शब्दांत मांडायला जमणार नाही... ती माझ्या आयुष्यात आली आणि सर्व बदलायला लागलं कधी कधी असं वाटतं. ती आयुष्यभर माझ्या सोबत राहावी इतकंच मागणं आहे..."*

*पुन्हा एकदा कॉलेज सुरु झालं पण यावर्षी माझा उत्साह पार शिगेला पोहोचला होता, ती ग्रॅज्युअशन च्या पहिल्या वर्ष्याला आणि मी दुसऱ्या वर्ष्याला होतो... कॉलेजला दोघेही सोबत जात होतो, परत येतांनी सोबत येत होतो, शिवाय वर्गातून प्रथम आल्याने माझी वर्गप्रतिनिधी म्हणून निवड झाली होती म्हणून एक नवी ओळख मिळाली होती आणि इतर शिक्षकांसोबत परिचय झाला होता... माझं कॉलेज जीवन आणखी आनंदी झालं होतं. वर्गात आणि कॉलेजमध्ये सन्मानाने वावरत होतो आणि आत्मविश्वास वाढला होता म्हणून विविध प्रकारच्या कार्यक्रमात सहभागी होत असे, असाच एक दिवस, दिनांक ५ सप्टेंबर, शिक्षकदिन निमित्त मी भाषणसाठी नावं दिलं होतं. याआधीही मी भाषण केले होते पण यावेळी एक गडबड झाली होती, मी चक्क भाषण करतांना सांगावयाचे मुद्दे विसरलो होतो आणि मी निराश झालो, घरी आल्यावर सरळ कबीरजवळ गेलो...*

*"कबीर, कबीर... आज मी एक गडबड केली माहित आहे? ऐक ना सांगतो, मी भाषण देत असता, भाषण विसरलो माझं नशीब कि मुलांच्या लक्षात यायच्या आधी मी भाषणाचा कसातरी शेवट केला... असं व्हायला नको होत निदान एक वर्गप्रतिनिधी असतांना मला असं अपेक्षित नाही... खरं कारण ऐकलं तर तू माझ्यावर हसशील, स्टेजवर जाऊन जेव्हा मी भाषणाला सुरुवात केली आणि सर्व विद्यार्थी नजर टाकली तेव्हा माझ्या समोरच्या मुलींच्या दुसऱ्याच रांगेत किर्तीप्रिया बसली होती... मग काय तिच्या नजरेला*

*नजर भिडली अन सर्वकाही जणू जागीच थांबलं असं मला वाटलं मी मध्येच बोलता बोलता काहीवेळ थांबलो, भानावर आलो तर पुढचा मुद्दा आठवत नव्हता मग नाईलाजाने तिथेच भाषणाचा शेवट करावा लागला..."*

*या अनुभवातून मी जरा सावरलो होतो, तिच्यावर असलेल्या प्रेमाच्या आहारी जाऊन मी काही वेळाकरिता भरकटलो होतो पण आता मला जाणीव झाली होती की ती जितकी महत्वाची होती तितकीच घरच्यांची माझ्याकडून असलेल्या अपेक्षांची पूर्तता होणे हे सुध्दा महत्वाचं होतं... म्हणून मी मनातलं प्रेम जोवर मी माझं ध्येय साध्य करत नाही तोवर व्यक्त करायचं नाही असं ठरवलं. तोपर्यंत फक्त जे जस आहे तसंच सुरु ठेवावं हेही स्वतःला समजावलं... सुरुवातीला तिला भेटायचं टाळण खूप कठीण होतं, सारखं मनात यायचं तिला पाहावं, तिच्याशी गप्पा मारत बसावं असं... कितीही तिच्या आठवणीत रमायचं नाही ठरवलं तरी डोळे मिटल्यावर ती नजरेसमोर यायची, मग मी रोज रोज तिच्यासोबत कॉलेजला जाणं कमी केलं, कधी आठवड्यातून एक दोनदा तर कधी दहा पंधरा दिवस झाले खूपच मन झालं तरच तिला भेटत होतो...*

*स्वतःला अभ्यासात झोकून दिलं, मी काही न काही काम शोधून व्यस्त राहत होतो... पण ज्यापासून दूर राहावं वाटतं कधी कधी नशीब जास्त जवळ घेऊन जातं, माझ्याबाबतीत तसंच झालं... एक दिवस कॉलेज मधून परत येतांना वाटेत एक युवक भेटला, नावं ' पवन ' आहे म्हणाला होता, पहिल्या दिवशी आमचा परिचय झाला, दोन तीन वेळा अशीच त्याच्याशी भेट झाली आणि एक दिवस त्याने मला एक प्रश्न विचारला,"किर्तीप्रिया आणि माझं नातं काय?"मी जरावेळ विचारात पडलो होतो"मित्र आहोत"असं सांगितलं, मी त्याला"तु तिला कसा काय ओळखतो?"विचारणार इतक्यात*

*त्याच घर आलं आणि माझा प्रश्न तसाच राहिला... त्यांनंतर दोन चार दिवस तो दिसलाच नाही, मी मात्र प्रश्नांनी वेढल्या गेलो होतो, डोकं ठणकायला लागलं होतं.... तिला भेटून एकदा विचारावं का? हाही प्रश्न मनात होताच. पण मीच तिला गैरसमज होऊ नये म्हणून काहीही विचारलं नाही...*

*आठवडा असाच निघून गेला आणि आणखी एकदा अचानक तो मला रस्त्याने भेटला... त्यादिवशी मला त्याच्याकडून सर्व काही कळलं, समजलं... जी परिस्थिती निर्माण झाली होती ती अगदीच अनपेक्षित आणि हाताबाहेरची होती... मन कसतरी सावरून मी घरी आल्यावर सरळ कबीर जवळ गेलो..."कबीर, असं काही तुला सांगावं लागेल आणि अशी वेळ येईल याची मला जराही कल्पना नव्हती, एक मित्र बनला आहे, पवन त्याच नाव... आधी त्याने माझ्याशी मैत्री केली मग माझं आणि किर्तीप्रियाच नातं काय हे जाणून घेतलं, मध्ये बरेच दिवस त्याच्याशी भेट झाली नाही आणि काल जेव्हा तो परत भेटला तेव्हा त्याने ' तो किर्तीप्रियाला कसं ओळखतो, त्याला ती खूप आवडते आणि तो तिच्यावर मनापासून प्रेम करतो. ' असं म्हणाला होता आणि सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे ' त्याला ती आवडते आणि तो तिच्यावर प्रेम करतो ' असं मित्र या नात्याने मी तिला सांगावं, त्याच्या प्रेमाचा प्रस्ताव सादर करून त्याची मदत करावी अशी अपेक्षा व्यक्त केली होती... आता मला कळत नाहीये मी काय करायला हवं?"कितीतरी वेळ मी विचार करत बसलो...*

*दुसऱ्या दिवशी सकाळी कॉलेजला जातांनी तिची भेट झाली.."कुमार, इतक्यात तु दिसला नाही"*

*“नाही, कॉलेजला यायला उशीर होत होता आणि परतायला सुध्दा म्हणून”*

*“अस्स होय, ठीक आहे.."*

*तिला पवनबद्दल विचारावं कि पवनने जे तिला सांगायला सांगितलं होतं ते सांगावं, मी विचारात गढून गेलो होतो.*

*“कुमार, इतक्यात तुला भेटणं खूप महत्त्वाचं होतं, तुला एक गोष्ट सांगायची आहे.."*

*“बोल ना, किर्तीप्रिया, काय म्हणतेस?”*

*“MS - CIT ला असतांना सहज पवन नावाच्या मुलाशी मैत्री झाली आणि रोज सोबत असल्याने बरंच काही बोलणं व्हायचं पण त्याने या सगळ्याचा काय अर्थ लावला कुणास ठाऊक? क्लास संपल्यावर त्याने माझा पाठलाग केला...”*

*“बरं पुढे काय झालं???”*

*“एकदा वाट अडवून त्याने मी त्याला आवडते असं सांगितलं... मी त्याला चांगलंच खडसावलं.. पुन्हा वाटेला आला तर पोलीस स्टेशन जाऊन तक्रार करेल असंही बजावलं...”*

*“अरे वा! तु तर खूप हिंमतीने आणि समजूतदारीने सर्व निस्तारलं..”*

*तिला त्यादिवशी भेटून मला माझ्या प्रश्नांची उत्तरं आणि मनाला समाधान दोन्ही मिळालं... पण मनात तिच्याबद्दल असलेलं प्रेम जास्त उफारून वर आलं... मी मात्र ती मनातील भावना आणि पवनचा निरोप व्यक्त केला नाही. बऱ्याच दिवसांनी तिच्याशी बोलत घरी आलो होतो, जुन्या आठवणी ताज्या झाल्या होत्या... परत एकदा..! त्यादिवसानंतर परत तिच्या भेटीचा मोह जडला, पुन्हा रोज सोबत कॉलेजला जाणं येणं सुरु झालं होतं.*

*एक दोन दिवस गेले आणि पवनशी भेट झाली तेव्हा त्याला इतकंच म्हणालो,"दोस्ता, गैरसमजुतीमुळे तु एक चांगली मैत्रीण गमावून बसला..."*

*तिला भेटल्यावर प्रत्येक दिवशी ती जास्त आवडायला लागली होती, मनात तिच्याबद्दल प्रेम हि एक भावना दिवसेंदिवस वाढतच गेली, तिचं चित्र जणू हृदयात छापलं होतं.. सणासुदीला मी आवर्जून भेटीला जात होतो, ती सजलेली, शृंगार केलेली,"किर्तीप्रिया"तेव्हा प्रथमच पाहतो कि काय असं वाटायचं, इतकी ती सुंदर दिसायची... तिच्या लांब केसांनी मनाला भुरळ घातली होती. त्यावर्षी सुध्दा दसरा, दिवाळी आणि नवीन वर्षाच्या तिला हार्दिक शुभेच्छा दिल्या होत्या... तेव्हा तिच्याशी बोलतांना वेळ कसा निघून गेला याच मला काहीच भान उरलं नव्हतं, ते क्षण आयुष्यभर आठवणीत राहतील इतकं नक्की..! या नवीन वर्ष्यात बऱ्याच गोष्टी सकारात्मक परिणाम करून गेल्या, ग्रॅज्युअशन चं दुसरं वर्ष पूर्ण होणार होत, सराव परीक्षा घेतली जात होती आणि तो दिवस उगवला ज्याची सर्वांना उत्सुकता लागली होती... १४ फेब्रुवारी, वेलेन्टाइन डे..! यावेळी तिला मनातलं सगळं सांगून प्रपोज करायचं ठरवलं होतं, हा*

*निर्णय मी जरी घेतला होता पण याचं निमित्त आणि प्रेरणास्थान माझे जिवलग मित्र होते... मला ती आवडते, फक्त आवडते असं नाही तर माझं तिच्यावर प्रेम आहे हे गोड गुपित माझ्याशिवाय फक्त कबीरलाच माहित होतं पण माझ्या जिवलग मित्रांची सर्व गुपित मला माहित होते आणि प्रेमाच्या परीक्षेत ते सर्व यशस्वी झाले होते, त्यात माझा खारीचा वाटा होता... म्हणून मित्रांसाठी मदत करू शकतो तर स्वतःसाठी का नाही? हा प्रश्न पडला आणि कितीदिवस असा लपंडाव खेळायचा, बस् खूप झालं, तिला एकदाच सांगून टाकावं असा निश्चय केला होता...*

*तिच्यासाठी एक छानपैकी ग्रिटींग आणि एक लाल गुलाब घेऊन, काय आणि कसं बोलावं याचा सराव करून कॉलेजला गेलो होतो, पण माझं दुर्दैव जास्तच जोरावर होतं, ती कॉलेजला आलीच नव्हती आणि त्यादिवशी एक नजर दिसली पण नव्हती... मग काय निराश होऊन कबीर जवळ ते ग्रिटींग आणि गुलाबाचं फुल घेऊन नशिबाला दोष देत बसून राहिलो होतो, मनात एकाच वेळी कितीतरी भावना येत होत्या... राग, दुःख, प्रेम..! एक क्षण आला की डोळयात आसवांनी गर्दी केली, एक दोन थेंब खाली पडले, दुःखाचा ओघ सरला, मी ओल्या पापण्या पुसल्या, सरसर झाडावर चढलो... झाडाच्या त्या फांदीजवळ, जिथं मी तिचं नाव कोरलं होतं.. जरा अस्पष्ट दिसत होत म्हणून मी पुन्हा नखाने तेच नाव ठळक केलं, तिच्या नावाखाली त्यावेळी स्वतःला न आवरता पहिल्यांदा लिहिलं"I love you..."मन तेव्हा कुठे जरा शांत झालं होतं. आधी तिला द्यायचे राहून गेलेले अजूनही तिची आठवण म्हणून जपून जवळ ठेवलेले ग्रिटींग कार्ड आणि एक पूर्ण सुकलेला पिवळा गुलाब याच्या सोबतीला आणखी एक ग्रिटींग कार्ड व लाल गुलाबाची भर पडली होती... मनात एक प्रश्न, नेमकं महत्वाचं काही तिला सांगायचं असलं, तिला भेटावस वाटलं, तिची अनावर ओढ लागली की का बरं ती दिसत नाही? भेटत नाही? म्हणून त्यादिवशी तिचा खूप जास्त, कधीच आला नाही इतका राग*

*आला होता. तो राग जवळपास दोन महिने कायम होता, त्या दोन महिन्यात तिला एकदाही भेटलो नाही कि तिच्याशी बोललो नाही. तिचा वाढदिवस माहित होता पण परत एकदा अपयशी ठरणारा प्रयत्न करायची मुळीच इच्छा झाली नाही, दरम्यान ग्रॅज्युअशन च्या दुसऱ्या वर्षाची परीक्षा सुरु झाली... आणि सुट्टी जाहीर करण्यात आली होती...*

*मग काय डोकं रिकामं झालं होतं, मे महिन्यात भर दुपारी कबीरजवळ बसून कादंबरी वाचत असताना, ती सोबत असतांना घालवलेले क्षण आठवले, सर्व जुन्या आठवणी जाग्या झाल्या, तिचा चेहरा नजरेसमोर आला मी हरवून गेलो होतो, स्वतःशीच बोलायला सुरुवात केली होती की कबीर सोबत कळलं नाही,"तु समोर असतांना काय बोलावं कळत नाही मात्र एकांतात खूप काही बोलतो... कबीरच्या सहवासात कितीतरी वेळ पापण्या मिटून बंद डोळ्यात तुझं प्रतिबिंब मी पाहतो, तु किती सुंदर आहे हे प्रतिबिंबाला मी सांगतो, तु कपाळावर टिकली पेक्षा लाल रंगाने जेव्हा बोटाने हळूच टिळा लावते तेव्हा जास्त मोहक दिसते, तुला तो लहानसा लाल रंगाचा टिळा शोभून दिसतो, तु लांब केसांची वेणी घालते ना खूप छान दिसते पण एकदाच जेव्हा तुला दोन वेण्या घातलेल्या असतांना पाहिलं ना, तेव्हा खरंच तु इतकी सुंदर दिसत होती की सांगायला शब्द नाहीत आणि तुला पाहतच राहावंसं वाटलं होतं... कोणताही ड्रेस तुला शोभून दिसतो, सर्व रंग तुला उठून दिसतात आणि तुझा चेहरा मनात घर करतो... तुला बघितलं कि सारं विसरायला होतं फक्त तूझा विसर पडत नाही, बंद पापण्यात तु आणि डोळे उघडले कि तुझी आठवण, तुझ्या भेटीचा मोह आवरता येत नाही... नकळत पावलं तुला भेटायचं म्हणून रस्त्याने चालायला लागतात, तुझा सहवास असतांना वाटतं की वेळ पुढे जाऊच नये, तु बोलत रहावं आणि मी फक्त तुला बघत राहावं, तुझं नावं जरी ओंठावर आलं ना, आजकाल अंगावर शहारे येतात... ऐक ना, तुला एक गोष्ट आणखी*

सांगायची राहिली, पेन हाती घेतला की नकळत हातावर, कागदावर तुझं नाव लिहितो. आजवर तु सुध्दा इतक्यावेळ स्वतःच नाव लिहिलं नसणार याची मला खात्री आहे... फक्त K अक्षर लिहायची वाट असते मग शब्द कोणताही असो, मी आधी"किर्तीप्रिया"लिहून काढतो... कित्येकदा नोट्स लिहितांना K अक्षराने सुरु होणाऱ्या शब्दाऐवजी Kirtipriya असं लिहिलं, नंतर लक्षात आल्यावर मी ते नावं खोडलं... पेपर लिहितांना असं व्हायला नको मीच स्वतःला बजावून सांगितलं होतं, नाहीतर माझी चांगलीच वाट लागली असती..."डोळे उघडले तर सूर्य मावळतीला आला होता, मनात पुन्हा तिला पाहण्याचा, भेटण्याचा, तिच्याशी बोलण्याचा विचार आला आणि मन तिच्या आठवणीत रमले... कबीरला बाय करून मी घरी आलो होतो...

मनातलं खूप दिवसांनी ओठांवर आलं होतं म्हणून कि काय? तिला भेटण्याची इच्छा झाली होती, बराच वेळ कसतरी टाळलं पण ओढ अनावर झाली आणि ती साधी एक नजर दिसावी, जर ती स्वतःहून बोलली तरच बोलायचं नाहीतर नाही.. असं ठरवून मी सायकल घेऊन बाहेर निघालो होतो पण मला जरा विसरच पडला होता की जेव्हा जेव्हा मला तिला बघावं किंवा भेटावं असं वाटतं तेव्हा ती जशी गायब होते... त्यादिवशी तसंच झालं ती दिसलीच नाही म्हणून सुजितला भेटून आलो होतो तर बोलता बोलता टायपिंग क्लास ला ऍडमिशन करायची असं आमचं ठरलं होतं... दोन तीन दिवसांनी आम्ही ऍडमिशन केली होती आणि एक दिवस जेव्हा मी क्लास करून घरी परत येत होतो, ती तिच्या अंगणात उभी असल्याचं मला दिसून आलं... तेव्हा ती जशी वागली त्यामुळे मी विचारातच पडलो होतो आणि तो किस्सा कधी एकदा कबीरला जाऊन सांगतो असं होऊन गेल होतं, कबीर जवळ बसलो आणि त्याला सांगायला सुरुवात केली,"कबीर, आज क्लास करून घरी परत येतांना ती समोर दिसली, मी सायकलचा वेग जरा कमी केला, तिच्यापर्यंत पोहोचणार होतोच कि अचानक तिने समोर येऊन

*सायकलचे हॅण्डल मधोमध पकडून मला जागीच थांबवलं... पण उन्हात सायकल जोरात चालवित आणल्यामुळे माझ्या चेहऱ्यावरून घामाचे लोट जसे वाहत होते म्हणून त्यावेळी तिच्याशी बोलत थांबण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती... तरी मी म्हणालो,"कितीप्रिया, हे तुझं काय चाललं?"*

*"कुठे काय? काही तर नाही..."*

*"असं मध्येच रस्त्यात सायकलच्या आड येणं, समजा माझा तोल गेला असता तर किंवा तुला लागलं असतं तर.."*

*"कुमार, ते होय, काही झालं नाही ना... आधी तु सांग इतके दिवस कुठे होता? दिसलाच नाही..."*

*तिचं असं निष्काळजीने वागणं मला जरा आवडलं नव्हतं म्हणून"मला ना आधीच घरी यायला खूप उशीर झाला आहे आणि भूक पण लागली आहे, आपण नंतर बोलू..."*

*"नाही, तु आता सांग, जास्त उशीर झाला नाही अजून... जवळपास दोन महिन्यापासून तुझा पत्ता नाही.."*

*"नंतर निवांत बोलू, आता मला जाऊ दे.."मी तिला टाळण्याचा प्रयत्न करत होतो, तिला न भेटल्याचं कारण सांगावं लागलं असतं, तिच्यावरचा राग हे कारण सांगणं*

*म्हणजे मग बोलता बोलता १४ फेब्रुवारी चा विषय निघाला असता याची मला भिती वाटत होती...*

*तिने हॅण्डल आणखी घट्ट धरून"नंतर वगैरे काही नाही, तु सांगणार आहे की नाही.... बोल पटकन"*

*तिचा असा हट्टीपणा माझ्यासाठी अगदी नवीन आणि अनपेक्षित होता, तिचं वागणं जरा आश्चर्याचं वाटलं होतं..."मी तुला नंतर सावकाश सांगतो, सध्या मला खूप भूक लागली आहे... प्लिज.."*

*"इतकीच भूक लागली आहे तर चल, आज माझ्याघरी जेवण कर..."म्हणत तिने हॅण्डल सोडून माझा हात पकडला होता...*

*तिच्या अश्या वागण्याने मला आश्चर्य आणि आनंद असा मिश्र भावनांचा अनुभव आला होता,"थांब, थांब जरा, त्यापेक्षा आपण आधी बोललो तर उत्तम होईल..."मलाच माघार घ्यावी लागली होती.*

*दोन्ही हातांची घडी घालून, एखाद्या फौजदारासारखी ती समोर उभी होती,"बोल इतक्यात कुठे होता?"*

*"ते काय झालं, यावर्षीचे विषय फार कठीण होते म्हणून पेपरसाठी खूप साऱ्या नोट्स काढाव्या लागल्या आणि अभ्यासाला जास्त वेळ दिला म्हणून..."*

*“अस्स होय, इतका अभ्यास केला की घरातून बाहेर निघालाच नाही!”डोळे मोठे करून ती बोलली तेव्हा मी हसण्यावाचून राहिलो नाही...*

*“हसतोस काय?”*

*“काही नाही, बस् सहज..”*

*“खरंच तु खूप अभ्यास केला तर यावर्षी पण पहिला येशील नाही???”*

*तिच्या या प्रश्नाने मी सावरलो,”म माहित नाही... बरं निघतो मी...”इतकं बोलून मी सायकल घेऊन घरी आलो होतो.*

*पण तिने विचारलेला प्रश्न कितीतरी दिवस मनात तसाच राहिला होता तर त्यादिवशीच्या तिच्या वागण्याने मला पहिल्यांदा प्रश्न पडला की तिच्याबद्दल माझ्या मनात जी भावना आहे, तीच भावना तिच्या मनात देखील असेल का? राहून राहून मन स्वतःच”हो”असं उत्तर देत होत... तो अनुभव काही वेगळाच होता, याआधी तिच्या बाजूने मी केव्हाच विचार केला नव्हता पण त्यादिवशी तिने जसा हट्ट धरला होता, सोबतच माझा रस्ता आणि हात धरून तिचं मला थांबवणं खूप आनंददायी वाटलं होतं, पुन्हा पुन्हा तेच ते आठवून मी एकांतात सुख अनुभवत होतो... तिच्यावरच प्रेम आता एका वेगळ्याच उंचीला पोहोचलं होतं, दिवसभरात कितीवेळ पापण्या बंद करून तिच्या आठवणीत रमतांना निघून जात होता आणि कित्येकदा तिचं नाव हातावर, पानावर*

*लिहिलं माहीत नाही, तिचं नाव लिहिण हाही एक छंद बनला होता... तर कबीरला एकूण एक गोष्ट सांगणं यांत एक वेगळा आनंद मिळत होता, त्याच्या सहवासात असलो कि मला तिच्याबद्दल बोलण्याचा मोह आवरता येत नव्हता, असंच कबीरजवळ एकदा बसलो होतो आणि मला तो किस्सा आठवला,*

*"कबीर... तुला एक गोष्ट तर सांगायची राहूनच गेली, दोन चार दिवस झाले बहुतेक, टायपिंग क्लास ला मी एकटाच गेलो होतो, टायपिंग मशीनवर पेज व्यवस्थित लावून मी कीबोर्डचा सराव करत होतो आणि बाजूला ठेवलेल्या पेजवरील शब्द टाइप करत होतो, अचानक तिची आठवण आली आणि तिचं नाव पेजवर मी कधी टाईप केलं समजलं नाही तर मी जेव्हा तीच नाव टाईप केल्याचं समजलो तेव्हा आणखी एकदा तिचं नाव टाईप करावंसं वाटलं म्हणून पुन्हा तिचं नाव टाईप केलं होतं, टाइपिंग मशीनने कोऱ्या कागदावर तीच नाव खूप छान दिसत होतं मग काय संपूर्ण पानभर तिचंच नाव टाईप केलं, पण पूर्ण टाईप करून झालं होतं मग मी ते पण मशीनमधून बाहेर काढलं आणि एक नजर पाहिलं, संपूर्ण पानावर एकच नाव....kirtipriya, kirtipriya फक्त kirtipriya... अन अचानक मनात विचार आला, एका क्षणाचाही विलंब न करता मी दुसऱ्या बाजूने टाईप केलं होतं,"kirtipriya I Love You..."तेव्हा मन खुष झालं होत आणि एकदा आणखी, एकदा आणखी असं करत पानांची दुसरी बाजू संपली होती, असे मी का केलं कळलं नाही पण मन समाधानी होत, एक प्रवाहात मी वाहत होतो, तिच्या आठवणीत ते पानही जुळलं..."*

*"पण मनातलं तिला सांगावं म्हटलं तर कसं सांगावं? काहीएक कळत नाही, कबीर... कधी ती वेळ येईल? जे मी पानावर लिहिलं, तुझ्या फांदीवर लिहिलं, मनात*

*कोरलं ते सारं काही तिला शब्द ओठांतून बाहेर आणून व्यक्त करता येईल... कुणास ठाऊक? बस् एकदा मला तिला मनातलं बोलून सांगायचं आहे... एक भिती वाटते की मी माझ्या भावना व्यक्त केल्यावर तिचा गैरसमज झाला तर मैत्रीचं नातं मी गमावून बसेल काय? म्हणून योग्य वेळेची वाट पहायला हवी...."*

## ४०. एक घाव आणखी

कुमारने असं लिहिलेलं वाचत असता प्रत्येक पानागणिक पुढे काय? हि उत्सुकता तिच्या मनात कायम राहिली, ती पुढे पुढे वाचत असताना कधी तिला प्रश्नांनी जाळयात ओढलं, तर कधी विचारमग्न केलं... कधी तिला खूप हसू आलं ती आठवणीत हरवून गेली, भानावर आली की पुन्हा एकदा कुमारची डायरी या वेगळ्या दुनियेत एकरूप होऊन गेली... डायरी जसजशी वाचून पूर्ण व्हायला लागली तेव्हा ती डायरी संपायला नको असंही तिला वाटायला लागलं, डायरीचे शेवटच्या पानातील काही प्रसंग तिला इतके अधीर करून गेले की तिच्याही पापण्या ओलावल्या, अश्रू अनावर झाले गालावरून खाली ओघळले... सायंकाळचे ७ वाजून गेले , सूर्य मावळला तेव्हा तिने शेवटचं पान वाचून डायरी मिटली आणि अखेर डायरीचं गुपित उघड झाले पण ते गुपित होते तेच बरं होतं असं तिला राहून राहून वाटलं... रोज नजरेसमोर असणारा हॉल तिला जास्त मोठा वाटायला लागला आणि एकटंपण इतक्या तीव्रतेनं जाणवलं की ती बेडरूम मध्ये गेली, तिने बिछान्यावर अंग टाकलं तसं विचारांनी तिला चारही बाजूंनी घेरलं... असं का झालं? खरंच कुमारने किती दिवस हे सारं काही गुपित ठेवून जगणं कबूल केलं? त्याची चूक झाली होती का? कि आणखी कुणाची? कुमारला समजून घ्यायला हवं होतं... प्रश्न तिचा पाठलाग करत होते, वारंवार मनात येणाऱ्या प्रश्नांनी तिला भंडावून सोडले, डोकं पार जड झालं, अखेर स्वतःला कसतरी सावरून तिने ओल्या पापण्या पुसल्या ती डायरी तिथेच ठेवून ती हॉलमध्ये येऊन सोफ्यावर बसली...

ती भावूक होऊन हॉलमध्ये कितीतरी वेळ तशीच बसून राहिली, अजूनही ती त्या डायरीच्या जगात वावरत होती, बाहेर सूर्यास्त होऊन अंधार पडला तरी तिने लाईट सुरु केले नव्हते... दारावर लावलेली बेल वाजली ती भानावर आली, ती जड पावलांनी सोफ्यावरून

उठली, तिने हॉलमधील लाईट सुरु केले आणि दार उघडले... पतीला एक नजर पाहून तिने त्याच्या हातातील बॅग आणि टिफिनची पिशवी हाती घेतली, रूममध्ये जाता जाता तिने टिफिन किचनमध्ये ठेवला, त्याची ऑफिस बॅग रूममध्ये ठेवून हॉलमध्ये आली, तो घरी परत आल्याने तिचं एकटंपण नाहीस झालं, तिच्या बेचैन मनाला जरा आधार मिळाला...

"मी पटकन हातपाय तोंड धुतो, लवकर गरमागरम चहा बनवं, आज ऑफिसला इतकं काम होत कि डोकं असं जड झालं की काय?"

तिने हसऱ्या मुखाने त्याला होकार दिला आणि तो सोफ्यावरून उठून हातपाय धुवायला गेला, ती किचनमध्ये चहा बनवायला... थोड्या वेळातच ती दोन कप चहा आणि थंडगार पाण्याची बॉटल घेऊन हॉलमध्ये आली, दोघांनी हाती कप घेतले, त्याने चहा प्यायला सुरुवात केली... एक घोट चहा पिल्यानंतर -"वा! तु आज काय चहा बनविला! लाजवाब, बऱ्याच दिवसांनी हि चव जिभेला लागली..."

तिने अजून कप हातातच धरलेला, ती विचारात बुडालेली, त्याच्या बोलण्याने तिला भान आलं"दररोज जसा बनविते, तसाच आजही बनविला..."

"पण आजचा चहा जरा विशेष वाटतोय, तू प्यायली नाहीस का?"

"जरा थंड झाल्यावर पिणार... म्हणून"

“झाला असेल की थंड, खरंच खूप मस्त चहा... वाह्वा..!”म्हणत त्याने एक घोट आणखी घेतला.

तिनेही कप ओठाला लावला, एक घोट घेतल्याबरोबर तिला कळलं की चहात साखर टाकलीच नाही आणि म्हणूनच तो तिची मस्करी करतोय,”सॉरी हं, चहात साखर टाकली नाही, माझ्या लक्षातच आलं नाही...”

“असू दे, कधी कधी लक्ष नाही राहत!”

तिने दोन्ही कप  किचनमध्ये परत नेले आणि पुन्हा एकदा चहा घेऊन ती हॉलमध्ये आली, दोघांनी चहा घेतला...”my dear wife, काय झालं? आज शांत का? बरं वाटत नाही का?”

“मी बरी आहे, मला काहीही झालं नाही.."

“आज खूपच शांत आहेस आणि चेहरा जरा उतरल्यासारखा दिसतोय...”

“इतक्यात उन्ह खूप तापत आहे ना म्हणून...”

“ठीक आहे... रोजच्या कामात हि चुकभुल होते, चहाचं मनाला लावून घेऊ नकोस....”

“चहाचं काय मनाला लावणार, आलेच..”असं त्याच्याशी बोलून तिने स्ट्रे उचलला, ती किचनकडे निघाली... चहा प्यायला वर तिचंही डोकं जरा शांत झालं, तिला क्षीण कमी होऊन तरतरी आल्याचं जाणवलं... मग ती काही वेळ पतीसोबत टी व्ही पाहत बसली, त्याच्या सहवासात ती पुन्हा बोलकी झाली आणि तीच मन परत ताळ्यावर आलं... तिने किचनमध्ये जाऊन स्वयंपाक करायला सुरुवात केली.

इकडे रुग्णालयात ---

जेव्हा जवळपास ६:३० वाजलेले, डॉक्टर देवांश वैद्य आणि नर्स यांनी कुमारला तपासलं, त्याच्या तब्येतीत बऱ्यापैकी सुधारणा झाली हे त्यांना कळलं आणि त्याचा त्यांना आनंदही झाला पण तो आनंदाचा क्षण कुमारच्या आई वडील, भाऊ, नातेवाईक, मित्र यांना सांगण्याआधीच जागीच विरला, एका चिंतेचा तिथे उगम झाला. सुरुवातीला डॉक्टर वैद्य यांना विश्वासच बसेना जे अनुभवास आलं ते इतकं अनपेक्षित होत की त्यांनी पुन्हा पुन्हा ती गोष्ट खरी आहे याची खात्री करून घेतली आणि लवकरात लवकर कुमारच्या कुटुंबियांना या गोष्टीची कल्पना देणे आवश्यक आहे हे जाणून आधी तिन्ही वडील मंडळींना केबिनमध्ये बोलावलं.... त्यांना धीर देत समोर बसवून शांततेने, मन घट्ट करून ऐकायला हवं असं सांगून कुमारची अशी अवस्था का झाली? तो कुणाशीही काहीच का बोलत नाही? या प्रश्नाचं उत्तर देताना त्यामागचं कारणही सर्वांना पटवून दिले. डॉक्टरांचं म्हणणं ऐकून जणू कुमारच्या वडिलांवर आभाळच कोसळलं, त्यांना डॉक्टर काहीतरी चुकीचं तपासणी करून असं बोलताहेत, असं वाटणं स्वाभाविक होते... पण डॉक्टर जेव्हा म्हणाले की कितीही नाकारलं तरी वास्तव बदलणार नाही आणि मी तुम्हाला जे काय सांगितलं ते सर्व मी खात्री केल्यावरच कळवलं... याक्षणी तुम्ही खचून जाऊ नका कारण कुमारचं ऑपरेशन करून त्याला वाचवणं जितकं मोठ्ठ आव्हान वाटलं होतं त्यापेक्षा जास्त मोठं आणि अगदी अनपेक्षित असं आपल्या समोर येऊन उभं आहे. फक्त तुम्ही सर्व धीराने या परिस्थितीचा सामना करण्यासाठी तयार राहा, बाकी आम्ही तुमच्या सोबत आहोतच..

ते तिन्ही वडील मंडळी केबिनमधून चेहऱ्यावर आलेली चिंतेची लहर लपविण्याचा प्रयत्न करत बाहेर पडले, त्यांना खरंच अजूनही कानाने जे ऐकलं ते विश्वास ठेवण्यासारखं वाटत नव्हतं आणि म्हणूनच ते बाकीच्यांना सांगाव कि नाही हे त्यांना कळत नव्हतं, तर त्यांना सांगावं तरी कसं? हाही एक प्रश्न होता... त्या तिघांना केबिनबाहेर आल्याचं पाहून कुमारची आई, प्रशांत, आकाश, आर्यन, अनिरुध्द, सुजित आणि ऋतुराज सर्व ते इकडे जवळ यायची वाट पाहत होते, ते कुमारच्या रुमजवळ पोहोचण्यापूर्वी हे सर्वजण त्यांच्याजवळ जाऊन बाजूने गोळा झाले.. बराच वेळ एकमेकांना पाहून मग सुजित आणि आकाश यांच्या वडिलांनी दोघांनी मिळून डॉक्टर काय म्हणाले ते त्यांना सांगितलं, सुरुवातीला कुणालाच काही कळलं नाही तर जेव्हा कळलं तेव्हा स्वतःच्या कानांवर विश्वासच बसत नव्हता... डॉक्टरांनी बरोबर तपासलं नसणार, ते रिपोर्ट आणखी कुणाचे तरी असतील, असे सर्व त्यांना सांगत होते.. कुमारच्या वडिलांनी त्यांना डॉक्टर जे म्हणाले ते सर्व खरं आहे आणि पूर्ण खात्री केल्यावर त्यांनी आम्हाला बोलावून सांगितलं... नशिबानं हा खेळ चालवला आहे, कुमारशी, आपल्याशी... यावेळी त्यांच्या डोळयांत आसवं आले, सर्वजण त्यांना धीर देत जे घडलं ते मान्य करून निराश झाले.

ती माऊली आशेनं कुमार ठीक होईल आपल्या मुलाच्या पुनर्जन्माचं सुख पदरात आलेलं परतून गेलं म्हणून टाहो फोडायला लागली, प्रशांत आणि बाकी सर्व तिला आणि स्वतःला सावरायला लागले. वास्तव समजून घ्यायला सर्वांना बराच वेळ लागला मग काय पुन्हा दुःखाची नव्याने बोचल्याची जाणीव झाली. सर्वांना आज वास्तव हे नेहमीच कल्पनेपेक्षा वेगळं असतं याची खात्री पटली, नशीबासमोर सगळे हतबल झाले, बाहेर सूर्य मावळला, इकडे रुग्णालयात कुमारच्या कुटुंबासह, मित्र परिवाराचे आशेचे किरणं लोपले तिथे जणू स्मशान शांतता पसरली. कुमारच्या रुमजवळ तिन्ही वडील मंडळी उभे, बाजूच्या खुर्च्यांवर ती माउली, प्रशांत, आकाश.. तेथून पुढे काही अंतरावर आर्यन, सुजित, अनिरुध्द आणि ऋतुराज मनात विचारांचं वादळं

उठलेलं असून गप्प उभे राहिले. वेळेचं भान आल्यावर बाहेर चांगलाच अंधार पडला त्यांना समजलं, रात्री आपण सर्व इथे थांबू शकणार नाही  म्हणून लवकर निघायला हवं या विषयाने शांतता भंग पावली, तेव्हा तिन्ही वडील मंडळी कुमारजवळ थांबणार आणि बाकीचे सर्व परत जाणार असं ठरवून तिथून घरी जायला निघाले, जी वेळ कुमार वर आली किंवा नियतीने आणली, त्याच्या कुटुंबाला आधाराची आता खरी आवश्यकता आहे हे समजून सगळे कुमारच्या घरीच पोह्चोचले. ते सर्व घरी आले तेव्हा संध्याकाळचे ७:३० वाजून गेले होते, सर्वजण हातपाय धुऊन घरात बसले तर ती माऊली डोळ्यांत पाणी आणि कुमार बरा होऊ दे असं मागणं देवाकडे करून मनोभावे पूजा करून, देवघरात बसली... अशी वेळ का म्हणून आमच्या आयुष्यात यावी? का कुमारला हे सारं सोसावं लागत आहे? तुला कधी काहीच कमी केलं नाही तरी तू आमच्यावर का म्हणून रुसला? असे प्रश्न विचारून तिने मनातलं गाऱ्हाणं देवापुढे मांडलं पण तरी तोच मदत करेन या आशेने नतमस्तक होऊन पाया पडली...

अनिरुध्द आणि आर्यन यांनी मिळून सर्वांसाठी चहा बनवला, चहा पिल्यानंतर  ते चौघे बाजूच्या खोलीत बसले, जे कुमारच्या जीवनात अचानक घडलं ते कल्पनेच्या दुनियेपासून कित्येक दूर होते, अजूनहि त्यांना डॉक्टरांनी सांगितले ते खरं वाटत नव्हतं. पण त्यांच्या मान्य किंवा अमान्य केल्याने वास्तव बदलणार नव्हतंच... डॉक्टरांच्या बोलण्याने त्यांनाही आश्चर्याचा धक्का बसला होता, आज पहिल्यांदा चौघे एकाच जागी बसले असून तिथे शांतता पसरली, बोलायला जणू शब्द नाहीत की काय? आर्यन ला मात्र ही शांतता जास्त वेळ रुचली नाही."दोस्तहो, मला तर अजूनही डॉक्टरांनी सांगितलेले पटत नाही, असं कसं काय होऊ शकतं?"

अनिरुध्द,"मन मानत नाही पण डॉक्टर आपल्याशी का म्हणून खोटं बोलणार, आपल्याला मान्य असो किंव नसो वास्तविकता नाकारता येणार नाही..."

सुजित,”तुझं म्हणणं बरोबर आहे, पण आपल्या कुमारसोबत असं का व्हावं? अपघातातून तो बचावला तर नशिबानं हे भलतंच समोर वाढून ठेवलं पण का?”

ऋतुराज,”आपण जे घडलं ते बदलू शकत नाही, तर विचार करत राहिलो तर आणखी प्रश्न पडतील आणि मन विचलित होईल...”

ऋतुराजच्या अश्या बोलण्याने ते तिघे जरा वेळ त्याच्याकडे पाहतच राहिले, याक्षणी हे तत्वज्ञान तो का म्हणून सांगतोय हे त्यांना कळलं नाही आणि किंचित नाराजीचा स्वर करून,”ऋतुराज, तु हे काय बोलतो आहे?”

ऋतुराज,”हे पहा, दोस्तहो, हि परिस्थिती लक्षात घेता आपण हे का झालं? कसं झालं? पुढे काय होणार? नशिबाला दोष देत बसल्यापेक्षा या वेळी यावर मात करण्यासाठी काय उपाय करता येतील याचा विचार करायला हवा...”

जरावेळ विचार केल्यावर त्यांना ऋतुराजचं म्हणणं पटलं, कि जे घडून गेलं ते का, कसं घडलं? याचा कितीही वेळा विचार केला तरी जे घडून गेलं ते बदलायचं तर राहील नाही, केवळ वेळ तसाच वाया जाईल आणि मन आणखी दुःखी होईल... म्हणून या परिस्थिती वर उपाय काय? याचा विचार करूया असं ठरवून आर्यन आणि अनिरुध्द जेवणाची व्यवस्था करण्यास निघून गेले. ऋतुराज आज घरी यायला जमणार नाही आणि कुमारच्या घरी मुक्कामी राहणार आहे म्हणून त्याच्या घरी कळवायला हवं म्हणून फोन करून सांगण्यासाठी खोलीतून बाहेर पडला, सुजित एकटाच त्या खोलीत बसून काही उपाय मिळतो का याचा विचार करू लागला. खूप वेळ विचार

केला पण काहीएक उपाय मिळत नाही असं त्याला समजून आलं, मनात बरेच विचार एकाचवेळी तांडव करू लागले तेव्हा तो बसल्या जागेवरून उठला आणि तीन चार पावलं टाकत समोरच्या भिंतीत कप्पे करून बनवलेल्या कपाट जवळ गेला, विचार करता करता त्याने नकळत एक रजिस्टर त्यातून बाहेर काढून उघडलं, ते कुमारचं रजिस्टर होतं आणि त्यावर सुंदर अश्या अक्षरात त्याच नाव लिहिलं होतं, पानाच्या सर्वांत वर ठळक अक्षरात लिहिलेलं”विद्या विनयेने शोभते”त्याने वाचलं, आशेचं किरण नजरेसमोर चमकले. तो पटकन खोलीतून बाहेर पडला आणि त्याला सुचलेली गोष्ट त्याने तिघांना सांगितली, सर्वांना ती कल्पना आवडली, सुजितला हे आधीच सुचायला हवं होतं असेही अनिरुध्द म्हणाला. या बिकट परिस्थितीतून कुमारला बाहेर काढायचं आहे  तर सुरुवात येथूनच करायला हवी, याची त्यांना जाणीव झाली आणि जरी अशक्य वाटत असले तरी सध्या हाच एकमेव पर्याय उपलब्ध आहे म्हणून असं करायचं सर्वांनी ठरवलं..”मी ना खरंच खूप मोठा विसरभोळा आहे, इतकी महत्वाची गोष्ट माझ्या लक्षात कशी आली नाही, मी हे कसं काय विसरलो? जास्त वेळ वाया जाण्याआधी मला आठवलं हे एक बरं झालं... आता आधी तिला फोन केला पाहिजे.”सुजित हळूच पुटपुटला आणि मोबाईल बाहेर काढून त्याने तिला फोन केला...

“हॅलो, मी सुजित... मला तुझ्याशी जरा महत्वाचं बोलायचं आहे...”

“हं बोल, पण आता यावेळी? कुमार ठीक तर आहे ना?”

“पहिलं म्हणजे कुमार तसा ठीक आहे पण एक भलतीच थट्टा नशिबानं आपल्या सर्वांशी केली, खास करून कुमारशी...”

“असं कोड्यात बोलू नकोस, काय झालं? ते  स्पष्ट सांग बरं..”

“जवळपास ६ वाजता, डॉक्टरांनी कुमारला तपासलं तेव्हा तो त्यांच्याशी बोलला आणि डॉक्टरांना त्याचा आजार समजला, कुमारने डॉक्टरांना विचारलं की ' मी कुठे आहे, तुम्ही कोण आहे? ' त्यावर डॉक्टरांनी, ' तुझा अपघात झाला आणि तुझं ऑपरेशन केलं... ' असं सांगितल्यावर तो काहीही बोलला नाही, असं डॉक्टर म्हणाले होते, डॉक्टरांनी जेव्हा परत त्याला विचारलं की ' कुमार, आता तुला कसं वाटत आहे? '  तेव्हा,  त्यांना एक नजर पाहून तो सारखा इकडे तिकडे पाहत होता, तर डॉक्टरांनी परत त्याला,' कुमार तुला बरं वाटत नाही का? ' असं विचारल्यावर, ' कोण कुमार? मी? ' असं तो म्हणाला होता, आणखी जरावेळ आई वडील, प्रशांत आणि मित्र परिवारबद्दल त्याला विचारल्यावर ' मला काही माहित नाही? मला काही एक आठवत नाही. ' असे तो म्हणाला होता, असं डॉक्टरांनी सांगितले...”

“या सगळ्याचा अर्थ काय? मला काहीच समजत नाहीये...”

“डॉक्टरांच्या भाषेत सांगायचे झाले तर कुमारला ' स्मृतिभ्रंश ' हा आजार झाला आहे...”

“स्मृतिभ्रंश??? हा कसला आजार आहे? कुमारला कसा झाला?”

“आपल्या सोप्या भाषेत सांगायचे झाले तर कुमार आजवर जे आयुष्य जगला त्याचा त्याला आता पूर्णपणे विसर पडला आहे, आता त्याला काहीच आठवण नाही...”

“काय??? पण हे कसं शक्य आहे? कुणी स्वतःच सारं आयुष्य कस काय विसरू शकत? मला हे मान्य नाही.. नक्की काहीतरी चुकले.”

“आधी आम्हाला सुद्धा यावर विश्वास बसला नाही पण डॉक्टरांनी खात्री करून नंतर हे सर्वांना सांगितलं...”

“पण असं अचानक का आणि कसं झालं?”

“त्याचा अपघात झाला, नंतर तो बेशुध्द होता आणि त्याच्या डोक्याला मार लागला होता यामुळे असं झालं असे डॉक्टर म्हणाले...”

“मला तर अजूनही यावर विश्वासच बसत नाही की कुमार सर्व विसरला... स्वतःच अस्तित्व सुध्दा!”

“स्वतःला सावर, आणि हो, मला आणखी एक महत्वाचं बोलायचं होतं म्हणून तुला फोन केला होता...”

“बोल ना, काय म्हणतोस..?”

“तुझ्या बॅगमध्ये एक बुक चुकून आलं होतं ना ते म्हणजे कुमारने लिहिलेली डायरी आहे आणि या संकटातून त्याची सुटका करायला त्या डायरीचीचं आता  आपल्याला मदत होईल...”

“बरं ठीक आहे, उद्याला येतेवेळी मी ती डायरी आठवणीने सोबत घेऊन येते...”

“ठीक आहे, मी फोन ठेवतो...”असं बोलून त्याने फोन कट केला...

त्याच्याशी फोनवर बोलून झालं आणि तिला नवीन प्रश्नांनी घेरलं, कुमार सोबत असं का झालं? खरंच असं होऊ शकते का? इतके वर्ष जगलेलं जीवन सहजासहजी कसं विसरता येईल? स्वतःच्या नावाचा देखील विसर पडावा हे तर अगदीच अशक्य! आपलं आयुष्य म्हणजे एक पुस्तक आणि कुमारच्या आतापर्यंतच्या जीवनाचे सारे पान कोरेच, त्याने जे क्षण पुन्हा जगून डायरीत लिहिले ते सुध्दा तो विसरला असेल का? डायरीचा विचार मनात येताच तिला नवा प्रश्न पडला, सुजितला डायरीबद्दल कसं कळलं? त्याने डायरी कधी बघीतली, त्याने ती डायरी वाचली असेल का? आणि जर त्याला डायरीचं गुपित माहिती आहे तर तो इतक्या सहजतेने कसा वागू शकतो......... सुजितने कुमारच्या आजाराबद्दल सांगितल्यावर तिच्या मनावर एक घाव बसला आणि डायरीचं बोलून एक घाव आणखी...! तिचं मन जरासं ताळ्यावर आलं होतं पण कुमार सोबत जे झालं ते ऐकून ती परत एकदा विचारांच्या वादळात अडकली, मन विचलित अन कश्यातच रमेनास झालं, ती नावालाच किचन मध्ये होती तर राहून राहून तिच्या मनात कुमार आणि त्याच्या डायरीबद्दल विचारचक्र फिरू लागले... तिने कसतरी काहीवेळ स्वतःला स्वयंपाकात झोकून जेवण बनवलं, रोजच्या सारखेच  तिने दोघांसाठी ताट वाढले पण आज  घास घशाखाली जात नव्हता  . ती समोर तो बसलेला आणि ताट वाढून घेतलेलं होत म्हणून दोन चार घास जेवली, त्याला ऑफिसची उर्वरित कामं करायची होती जेवण लवकर आटोपून बाजूच्या खोलीत गेला, तिच्या ताटात वाढून घेतलेलं सर्व जसच्या तसंच होतं, तिने दोघांचे ताट किचनमध्ये ठेवले, तिने बेडरूमध्ये जाऊन बिछान्यावर अंग टाकले तसे नाईट लॅम्पच्या मंद उजेडात, नीरव

शांततेत असंख्य विचारांनी तिला वेढा घातला आणि जसजशी रात्र झाली तसतसा विचारांचा प्रभाव वाढत राहिला, मन बेचैन होऊन भावनांचा पूर डोळयातून वाहिला, आसवांच्या धारांनी उशी जरा ओली झाली, रात्र अशीच ढळली पण तिच्या डोळयाला डोळा लागला नाही...

मला काही सांगाचंय... भाग ५... लवकरच

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. प्रफ़ुल शेजव यांचं हे चवथं पुस्तक.**

प्रकाशक मिळत नसल्यामुळे लेखनाकडे दुर्लक्ष करणारे प्रफ़ुल शेजव यांच्यासारखे काही प्रतिभावान लेखक असतात. अतिशय चांगले तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. त्यांच्या कथा मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज

ई साहित्य प्रतिष्ठान

गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणुक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान